नाशिक महानगरपालिका, नाशिक

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम – १०० अन्वये

मा. महासभेने संमत केलेले

अंदाजपत्रक

'अ', 'क' आणि 'प'

सन २०२०–२०२१

(सन २०१९–२०२० च्या सुधारित अंदाजपत्रकासह)



महाराष्ट्र महानगरपालिका
अधिनियमाचे कलम १०० अन्वये

मा.महासभेने संमत केलेले
व मान्यता दिलेले

अंदाजपत्रक

'अ', 'क' आणि 'प'

सन २०२०-२०२१

नाशिक महानगरपालिका, नाशिक

अनुक्रमणिका

अ.नं.	तपशील	पृष्ठ क्रमांक
1	मा. महापौरांचे निवेदन	42-45
2	मा. स्थायी समिती सभापतींचे निवेदन	46-47
3	मा. आयुक्तांचे निवेदन	48-70
4	जमा / खर्चाचे आलेख	71-79
5	महसुली व भांडवली जमा गोषवारा	80 - 81
6	महसुली व भांडवली खर्च गोषवारा	82-84
भाग- एक	**''अ'' अंदाजपत्रक**	**85-182**
7	"अ" महसुली जमा	85-105
8	"अ" महसुली जमा अनुदाने	96-98
9	"अ" भांडवली जमा	106
10	"अ" भांडवली जमा अनुदाने	106
11	"अ" महसुली खर्च	108-164
12	"अ" भांडवली खर्च	166-182
भाग- दोन	**"क" अंदाजपत्रक**	**183-202**
13	"क" महसुली जमा	183-184
14	"क" भांडवली जमा	185
15	"क" महसुली खर्च	186-196
16	"क" भांडवली खर्च	197-202
भाग- तीन	**"प" अंदाजपत्रक**	**203-215**
17	"प" महसुली जमा	203-205
18	"प" महसुली जमा अनुदाने	204
19	"प" भांडवली जमा	206
20	"प" भांडवली जमा अनुदाने	206
21	"प" महसुली खर्च	207-214
22	"प" भांडवली खर्च	215
भाग-चार	**राखीव निधी व जिल्हा/राज्य/केंद्र शासकीय योजना**	**216-257**
23	राखीव निधी	216-242
24	जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान	243-255
25	अमृत योजना	256-257
भाग-पाच	**भांडवली कामे**	**258-422**
26	भांडवली कामांचा गोषवारा	258-262
27	भांडवली कामांच्या याद्या (अ, ब, क, ड, इ)	263-422
28	मा. स्थायी समिती ठराव	423-451
29	मा. महासभा ठराव	452-468
30	वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक ठराव	469-470



छत्रपती शिवाजी महाराज



राजर्षि छत्रपती शाहु महाराज



महात्मा ज्योतिबा फुले




भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



कविवर्य वि.वा.(तात्यासाहेब) शिरवाडकर - कुसुमाग्रज




स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी

माजी पंतप्रधान



हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे



मा.श्री.रामनाथ कोविंद

राष्ट्रपती



मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी

पंतप्रधान



मा.श्री.जे.पी.नड्डा

राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी



मा.ना.श्री.अमित शहा

केंद्रीय गृह मंत्री



मा.ना.श्री.नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री (रस्ते, दळण-वळण, जहाज बांधणी)



मा.श्री.शरद पवार

माजी केंद्रीय कृषीमंत्री, भारत सरकार तथा
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



मा.सोनीया गांधी

अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस



मा.श्री.उध्दवजी ठाकरे

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री.अजित पवार

उपमुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन,
महाराष्ट्र राज्य



मा.आ.श्री.चंद्रकांतदादा पाटील

प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी



मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस

माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्ष नेते, विधानसभा महाराष्ट्र



मा.ना.श्री.छगन भुजबळ

मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, नाशिक



मा.आ.श्री.गिरीष महाजन

माजी पालक मंत्री, नाशिक



मा.श्री.राजसाहेब ठाकरे

अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना



मा.श्री.रामदास आठवले

केंद्रीय मंत्री, सामाजिक न्याय एवं अधिकारीता मंत्रालय तथा
राष्ट्रीय अध्यक्ष, आर.पी.आय.(अे)



मा.श्री.बाळासाहेब थोरात

महसुल मंत्री तथा
प्रदेशाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस



मा.श्री.जयंत पाटील

जलसंपदा मंत्री तथा
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



मा.श्री.किशोर काळकर

विभाग संघटन मंत्री, भाजपा



मा.श्री.हेमंत गोडसे
खासदार



मा.डॉ.सौ.भारतीताई पवार
खासदार
प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा



मा.प्रा.सौ.देवयानी फरांदे
आमदार
प्रदेश सरचिटणीस, भाजपा



मा.ॲड.श्री.राहुल ढिकले
आमदार



मा.डॉ.श्री.राहूल आहेर
आमदार



मा.सौ.सीमाताई हिरे
आमदार



मा.श्री.हेमंत टकले
आमदार



मा.श्रीम.सरोजताई आहिरे
आमदार



मा.श्री.किशोर दराडे
आमदार



मा.डॉ.श्री.सुधीर तांबे
आमदार



मा.श्री.नरेंद्र दराडे
आमदार



मा.श्री.गिरीष पालवे
शहराध्यक्ष, भाजपा, नाशिक



मा.श्री.वसंत गिते
सदस्य, महा.प्रदेश, भाजपा



मा.श्री.सुनिल बागुल
सदस्य, महा.प्रदेश, भाजपा



मा.श्री.लक्ष्मण सावजी
सदस्य, महा.प्रदेश, भाजपा



मा.श्री.विजय साने
जेष्ठ नेते, भाजपा



मा.श्री.सुहास फरांदे
जेष्ठ नेते, भाजपा




मा.श्री.सचिन मराठे
महानगर प्रमुख, शिवसेना



मा.श्री.महेश बिडवे
महानगर प्रमुख, शिवसेना



मा.श्री.अंकुश पवार
शहराध्यक्ष, मनसे



मा.श्री.रंजन ठाकरे
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



मा.श्री.शरद आहेर
शहराध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस



मा.श्री.प्रकाश लोंढे
शहराध्यक्ष, आर.पी.आय.(ए)



स्वर्गीय शांतारामबापू वावरे

प्रथम महापौर

सन १९९२-९३, १९९३-९४



स्वर्गीय पंडीतराव खैरे

माजी महापौर

सन १९९४-९५




स्वर्गीय उत्तमरावजी ढिकले

माजी महापौर

सन १९९५-९६

सन्माननीय माजी महापौरांची कारकिर्द



मा.श्री.प्रकाश मते
सन १९९६-१९९७



मा.श्री.वसंतराव गिते
सन १९९७-१९९८



मा.श्री.अशोक दिवे
सन १९९८-१९९९



मा.डॉ.सौ.शोभाताई बच्छाव
सन १९९९-२००२



मा.श्री.दशरथ (अप्पा) पाटील
सन २००२-२००५



मा.श्री.बाळासाहेब सानप
सन २००५-२००७



मा.श्री.विनायक पांडे
सन २००७-२००९



मा.सौ.नयना घोलप
सन २००९-२०१२



मा. श्री.यतिन वाघ
सन २०१२-२०१४



मा.श्री.अशोक मुर्तडक
सन २०१४-२०१७



मा.सौ.रंजना भानसी
सन २०१७-२०१९

सन्माननीय माजी उपमहापौरांची कारकिर्द



मा.सौ.सुमनताई बागले
सन १९९२-१९९३



मा.सौ.शोभाताई छाजेड
सन १९९३-१९९४




मा.श्री.रामदास सदाफुले
सन १९९४-१९९५



मा.सौ.रंजनाताई बोराडे
सन १९९५-१९९६



मा.श्री.अशोक गोसावी
सन १९९६-१९९७



मा.श्री.मनिष बस्ते
सन १९९७-१९९८



मा.श्री.बाळासाहेब सानप
सन १९९८-१९९९



मा.श्री.गुलाम शेख
सन १९९९-२००२



मा.सौ.शोभना आहेर
सन २००२-२००५




मा.श्री.विनायक पांडे
सन २००५-२००७



मा.श्री.अजय बोरस्ते
सन २००७-२००९



मा.प्रा.सौ.देवयानी फरांदे
सन २००९-२०१२



मा.श्री.सतिश कुलकर्णी
सन २०१२-२०१४



मा.श्री.गुरुमित बग्गा
सन २०१४-२०१७



मा.श्री.प्रथमेश गिते
सन २०१७-२०१९

सन्माननीय माजी स्थायी समिती सभापती कारकिर्द



मा.श्री.उत्तमराव एलिया कांबळे
सन १९९२-९३, ९३-९४, २०००-०१



मा.श्री.निवृत्ती विठोबा आरिंगळे
सन १९९४-९५



मा.श्री.विजय बळवंत पाटील
सन १९९५-९६, ९६-९७



मा.श्री.बाळासाहेब सोनुजी आहेर
सन १९९७-९८



मा.श्री.शाहू सहदेवराव खैरे
सन १९९८-९९, २००३-०४



मा.श्री.अमोल रंगनाथ जाधव
सन १९९९-२०००



मा.श्री.नामदेव नभाजी महाले
सन २००१-२००२



मा.श्री.विजय राजाराम साने
सन २००२-२००३




मा.श्री.बळीराम रामभाऊ ठाकरे
सन २००४-२००५



स्व.अशोक सिताराम गवळी
सन २००५-२००६



मा.श्री.सुरेश अण्णाजी पाटील
सन २००६-२००७



मा.श्री.शरद किसनराव कोशिरे
सन २००७-२००८



मा.श्री.संजय उत्तमराव चव्हाण
सन २००८-२००९



मा.श्री.संजय किसनराव बागुल
सन २००९-२०१०



मा.श्री.संजय भरत सावळे
सन २०१०-२०११



मा.श्री.रणजित वसंतराव नगरकर
सन २०११-२०१२



मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
सन २०१२-२०१३



मा.श्री.रमेश शंकर धोंगडे
सन २०१३-२०१४



मा.ॲड.श्री.राहुल उत्तमराव ढिकले
सन २०१४-२०१५



मा.श्री.शिवाजी(आप्पा)चुंभळे
सन २०१५-२०१६



मा.श्री.सलिम इस्माईल शेख
सन २०१६-२०१७



मा.श्री.शिवाजी गांगुर्डे
सन २०१७-२०१८




मा.सौ.हिमगौरी आहेर
सन २०१८-२०१९



मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
सन २०१९-२०२०

सन्माननीय पदाधिकारी



मा.श्री.सतिष कुलकर्णी

महापौर, नाशिक



मा.श्रीम.भिकुताई बागुल

उपमहापौर, नाशिक



मा.श्री.गणेश गिते

सभापती, स्थायी समिती



मा.श्री.राधाकृष्ण गमे

आयुक्त, नाशिक

सन्माननीय पदाधिकारी



मा.श्री.सतिष सोनवणे
सभागृह नेता



मा.श्री.अजय बोरस्ते
विरोधी पक्ष नेता



मा.श्री.जगदीश पाटील
भाजपा गटनेता



मा.श्री.विलास शिंदे
शिवसेना गटनेता



मा.श्री.गजानन(नाना)शेलार
राष्ट्रवादी काँग्रेस गटनेता



मा.श्री.शाहु सहदेवराव खैरे
काँग्रेस गटनेता



मा.सौ.नंदिनी बोडके
मनसे गटनेता



मा.सौ.दिक्षाताई लोंढे
आर.पी.आय., गटनेता

विद्यमान स्थायी समिती



मा.श्री.गणेश बबन गिते
सभापती, स्थायी समिती



मा.श्री.अशोक देवराम मुर्तडक
सदस्य



मा.श्री.कमलेश मोहन बोडके
सदस्य



मा.श्री.सुधाकर भिका बडगुजर
सदस्य



मा.सौ.सत्यभामा लक्ष्मण गाडेकर
सदस्या



मा.सौ.कल्पना चंद्रकांत पांडे
सदस्या



मा.श्री.राहुल अशोक दिवे
सदस्य



मा.प्रा.श्री.शरद चिंतामण मोरे
सदस्य




मा.सौ.रुपाली यशवंत निकुळे
सदस्या



मा.सौ.स्वाती राजीव भामरे
सदस्या



मा.सौ.सुप्रिया सुनिल खोडे
सदस्या



मा.श्री.हेमंत दिनेश शेट्टी
सदस्य



मा.श्री.राकेश राजेंद्र दोंदे
सदस्य



मा.सौ.सुनिता उत्तम कोतुळे
सदस्या



मा.सौ.वर्षा अनिल भालेराव
सदस्या



मा.श्रीम.समिना शोएब मेमन
सदस्या

सन्माननीय नगरसेवक



मा.सौ.पुनम संजय धनगर
प्रभाग १ अ



मा.सौ.रंजना पोपट भानसी
प्रभाग १ ब



मा.श्री.गणेश बबन गिते
प्रभाग १ क



मा.श्री.अरुण बाबुराव पवार
प्रभाग १ ड



मा.सौ.पुनम भरत सोनवणे
प्रभाग २ अ



मा.श्री.सुरेश नारायण खेताडे
प्रभाग २ ब



मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
प्रभाग २ क



मा.सौ.शितल नितीन माळोदे
प्रभाग २ ड



मा.श्री.मच्छिंद्र बाळासाहेब सानप
प्रभाग ३ अ



मा.सौ.प्रियंका धनंजय माने
प्रभाग ३ ब



मा.सौ.पुनम दिगंबर मोगरे
प्रभाग ३ क



मा.श्री.रुचीकुमार मधुकरराव कुंभारकर
प्रभाग ३ ड


(रिक्त)
प्रभाग ४ अ



मा.सौ.सरिता रामराव सोनवणे
प्रभाग ४ ब



मा.श्री.जगदिश चिंतामण पाटील
प्रभाग ४ क



मा.श्री.हेमंत दिनेश शेट्टी
प्रभाग ४ ड

सन्माननीय नगरसेवक



मा.श्री.कमलेश मोहन बोडके
प्रभाग ५ अ



मा.सौ.नंदिनी खंडू बोडके
प्रभाग ५ ब



मा.सौ.विमल रमेश पाटील
प्रभाग ५ क



मा.श्री.गुरुमित अर्जुनसिंग बग्गा
प्रभाग ५ ड



मा.श्री.पुंडलिक पांडुरंग खोडे
प्रभाग ६ अ



मा.सौ.सुनिता ज्ञानेश्वर पिंगळे
प्रभाग ६ ब



मा.श्रीम.भिकुबाई किसन बागुल
प्रभाग ६ क



मा.श्री.अशोक देवराम मुर्तडक
प्रभाग ६ ड



मा.श्री.अजय भास्करराव बोरस्ते
प्रभाग ७ अ



मा.सौ.हिमगौरी बाळासाहेब आहेर
प्रभाग ७ ब



मा.सौ.स्वाती राजीव भामरे
प्रभाग ७ क




मा.श्री.योगेश रामराव हिरे
प्रभाग ७ ड




मा.श्रीम.नयना भरत गांगुर्डे
प्रभाग ८ अ



मा.सौ.राधा विष्णू बेंडकोळी
प्रभाग ८ ब



मा.श्री.संतोष धोंडिराम गायकवाड
प्रभाग ८ क



मा.श्री.विलास रामदास शिंदे
प्रभाग ८ ड

सन्माननीय नगरसेवक




मा.श्री.रविंद्र गोविंद धिवरे
प्रभाग ९ अ



मा.सौ.हेमलता दादा कांडेकर
प्रभाग ९ ब



मा.सौ.वर्षा अनिल भालेराव
प्रभाग ९ क



मा.श्री.दिनकर धर्मा पाटील
प्रभाग ९ ड



मा.सौ.माधुरी गणेश बोलकर
प्रभाग १० अ



मा.सौ.पल्लवी स्वप्नील पाटील
प्रभाग १० ब



मा.श्री.शशिकांत हरिभाऊ जाधव
प्रभाग १० क



मा.श्रीम.इंदुबाई सुदाम नागरे
प्रभाग १० ड



मा.सौ.दिक्षा दिपक लोंढे
प्रभाग ११ अ



मा.श्री.योगेश किरण शेवरे
प्रभाग ११ ब




मा.श्री.सलिम इस्माईल शेख
प्रभाग ११ क



मा.सौ.सिमा गोकुळ निगळ
प्रभाग ११ ड



मा.श्रीम.प्रियंका किशोर घाटे
प्रभाग १२ अ



मा.श्री.समीर उत्तमराव कांबळे
प्रभाग १२ ब



मा.डॉ.सौ.हेमलता निनाद पाटील
प्रभाग १२ क



मा.श्री.शिवाजी त्र्यंबक गांगुर्डे
प्रभाग १२ ड

सन्माननीय नगरसेवक



मा.श्रीम.वत्सला अर्जुन खेरे
प्रभाग १३ अ



मा.श्री.गजानन दामोदर शेलार
प्रभाग १३ ब



मा.ॲड.सौ.वैशाली भोसले
प्रभाग १३ क



मा.श्री.शाहु सहदेवराव खेरे
प्रभाग १३ ड



मा.सौ.शोभा संजय साबळे
प्रभाग १४ अ



मा.श्रीम.समिना शोएब मेमन
प्रभाग १४ ब



मा.श्री.मुशिर मुनिरोद्दीन सैय्यद
प्रभाग १४ क



मा.श्री.सुफियान इब्राहिम जीन
प्रभाग १४ ड



मा.सौ.अर्चना चंद्रकांत थोरात
प्रभाग १५ अ



मा.सौ.सुमन मधुकर भालेराव
प्रभाग १५ ब



मा.श्री.प्रथमेश वसंत गिते
प्रभाग १५ क



मा.सौ.सुषमा रवि पगारे
प्रभाग १६ अ



मा.सौ.आशा रफिक तडवी
प्रभाग १६ ब



मा.श्री.अनिल रामभाऊ ताजनपुरे
प्रभाग १६ क



मा.श्री.राहुल अशोक दिवे
प्रभाग १६ ड



मा.श्री.प्रशांत अशोक दिवे
प्रभाग १७ अ

सन्माननीय नगरसेवक



मा.सौ.मंगला प्रकाश आढाव
प्रभाग १७ ब



मा.सौ.सुमन ऊर्फ अनिता दत्तात्रय सातभाई
प्रभाग १७ क



मा.श्री.दिनकर गोटीराम आढाव
प्रभाग १७ ड



मा.प्रा.श्री.शरद चिंतामण मोरे
प्रभाग १८ अ



मा.श्रीम.रंजना प्रकाश बोराडे
प्रभाग १८ ब



मा.सौ.मिरा बबन हांडगे
प्रभाग १८ क



मा.श्री.विशाल उत्तम संगमनेरे
प्रभाग १८ ड



मा.श्री.संतोष शंकर साळवे
प्रभाग १९ अ



मा.सौ.जयश्री नितीन खर्जुल
प्रभाग १९ ब



मा.श्री.पंडीत दगु आवारे
प्रभाग १९ क



मा.श्री.अंबादास भास्कर पगारे
प्रभाग २० अ



मा.डॉ.सौ.सिमा राजेंद्र ताजणे
प्रभाग २० ब



मा.सौ.संगिता हेमंत गायकवाड
प्रभाग २० क



मा.श्री.संभाजी शामराव मोरुस्कर
प्रभाग २० ड



मा.ॲड.श्रीम.कोमल प्रताप मेहरोलिया
प्रभाग २१ अ



मा.श्री.रमेश शंकर धोंगडे
प्रभाग २१ ब


सन्माननीय नगरसेवक



मा.सौ.ज्योती शाम खोले
प्रभाग २१ क



मा.श्री.सूर्यकांत पांडूरंग लवटे
प्रभाग २१ ड



मा.श्री.जगदीश शंकर पवार
प्रभाग २२ अ



मा.सौ.सत्यभामा लक्ष्मण गाडेकर
प्रभाग २२ ब



मा.सौ.सुनिता उत्तम कोतुळे
प्रभाग २२ क




मा.श्री.केशव सिताराम पोरजे
प्रभाग २२ ड



मा.सौ.रुपाली यशवंत निकुळे
प्रभाग २३ अ



मा.श्रीम.शाहिन सलिमबेग मिर्झा
प्रभाग २३ ब



मा.श्री.सतीश लक्ष्मणराव कुलकर्णी
प्रभाग २३ क



मा.श्री.चंद्रकांत कारभारी खोडे
प्रभाग २३ ड



मा.सौ.कल्पना चंद्रकांत पांडे
प्रभाग २४ अ



मा.श्री.राजेंद्र उत्तमराव महाले
प्रभाग २४ ब



मा.सौ.कल्पना शिवाजी चुंभळे
प्रभाग २४ क



मा.श्री.प्रविण सावळीराम तिदमे
प्रभाग २४ ड



मा.श्री.सुधाकर भिका बडगुजर
प्रभाग २५ अ



मा.सौ.हर्षा सुधाकर बडगुजर
प्रभाग २५ ब


सन्माननीय नगरसेवक



मा.सौ.भाग्यश्री राकेश ढोमसे
प्रभाग २५ क



मा.श्री.शामकुमार दादाजी साबळे पाटील
प्रभाग २५ ड



मा.श्री.मधुकर भागीरथ जाधव
प्रभाग २६ अ



मा.सौ.हर्षदा समाधान गायकर
प्रभाग २६ ब



मा.सौ.अलका कैलास आहिरे
प्रभाग २६ क



मा.श्री.भागवत पाराजी आरोटे
प्रभाग २६ ड



मा.श्री.राकेश राजेंद्र दोंदे
प्रभाग २७ अ



मा.श्री.चंद्रकांत महादेव खाडे
प्रभाग २७ ब



मा.सौ.किरण पुंजाराम गामणे
प्रभाग २७ क



मा.सौ.कावेरी मारुती घुगे
प्रभाग २७ ड



मा.श्री.दत्तात्रय ग्यानदेव सुर्यवंशी
प्रभाग २८ अ



मा.सौ.प्रतिभा बाळासाहेब पवार
प्रभाग २८ ब



मा.सौ.सुवर्णा दिपक मटाले
प्रभाग २८ क



मा.श्री.दिपक निवृत्ती दातीर
प्रभाग २८ ड



मा.सौ.छाया दिलीप देवांग
प्रभाग २९ अ



मा.सौ.रत्नमाला सुरेश राणे
प्रभाग २९ ब

सन्माननीय नगरसेवक



मा.श्री.मुकेश दिलीप शहाणे
प्रभाग २९ क



मा.श्री.निलेश हंसराज ठाकरे
प्रभाग २९ ड



मा.श्री.श्याम धर्मराज बडोदे
प्रभाग ३० अ



मा.सौ.सुप्रिया सुनिल खोडे
प्रभाग ३० ब



मा.डॉ.सौ.दिपाली सचिन कुलकर्णी
प्रभाग ३० क



मा.श्री.सतिश यादवराव सोनवणे
प्रभाग ३० ड



मा.श्री.भगवान सुकदेव दोंदे
प्रभाग ३१ अ



मा.सौ.पुष्पा साहेबराव आव्हाड
प्रभाग ३१ ब



मा.सौ.संगिता अमोल जाधव
प्रभाग ३१ क



मा.श्री.सुदाम शंकर डेमसे
प्रभाग ३१ ड

सन्माननीय स्वीकृत नगरसेवक



मा.श्री.बाजीराव लहानु भागवत



मा.श्री.प्रशांत गोरख जाधव



मा.ॲड.श्री.अजिंक्य विजय साने



मा.ॲड.सौ.शामला हेमंत दिक्षीत



मा.श्री.सुनिल बाबुराव गोडसे

समाजलक्षी संघटना व बिगर सरकारी संघटनांचे प्रतिनिधी




मा.श्री.राजेश प्रभाकर गांगुर्डे
नाशिक पूर्व प्रभाग



मा.श्री.वापुराव दत्तात्रय कुलकर्णी
नाशिक पूर्व प्रभाग



मा.श्री.भुषण एकनाथ महाजन
नाशिक पूर्व प्रभाग



मा.श्री.किशन होलाराम अडवाणी
नाशिक पश्चिम प्रभाग



मा.श्री.पोपट वामन नागपुरे
नाशिक पश्चिम प्रभाग




मा.श्री.विवेक श्रीराम संत
नाशिक पश्चिम प्रभाग



मा.श्री.महेंद्र यशवंत आव्हाड
पंचवटी प्रभाग




मा.श्री.अनिल सुकदेव वाघ
पंचवटी प्रभाग



मा.श्री.सुधाकर गणेश माहुरकर
पंचवटी प्रभाग



मा.सौ.कांता सुरेश वराडे
नाशिक रोड प्रभाग



मा.श्री.अशोक तेजमल तापडीया
नाशिक रोड प्रभाग



मा.श्री.शंकर खंडू साडे
नाशिक रोड प्रभाग



मा.श्री.विजय नामदेव भंदुरे
सातपुर प्रभाग



मा.श्री.दशरथ लक्ष्मण लोखंडे
सातपुर प्रभाग



मा.सौ.पंकज मनोज संधान
नवीन नाशिक प्रभाग



मा.श्री.महारु(नानासाहेब)शंकर निकम
नवीन नाशिक प्रभाग



मा.श्री.धनाजी बहिरु लगड
नवीन नाशिक प्रभाग

नाशिक महानगरपालिका नाशिक
सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक 'अ', 'क' आणि 'प'बाबत
मा.महापौर यांचे निवेदन



नाशिक महानगरपालिकेच्या सहाव्या पंचवार्षिक मधील दुस-या सत्राच्या कालावधी करीता महापौर तथा प्रथम नागरीक होण्याची संधी मला मिळाली.

नाशिक शहराची मंत्रभुमी ते यंत्रभुमी आाणि ऐतिहासिकतेचे शहर म्हणून ओळख असल्याने सातत्याने शहराचा झपाटयाने विकास होत आहे. मुंबई-पुणे-नाशिक असा विकसीनशील शहराचा सुवर्ण त्रिकोण म्हणुन ओळख असल्याने नागरी विकास कामांसाठी या अर्थसंकल्पात पुरेशी अशी तरतूद करण्यात आली आहे.

नाशिकचा विकास, प्रगती आणि नाशिक शहराचे उज्वल नांव हेाण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष अशा तरतुदी केल्या असून त्या प्रत्यक्षात कृतीत उतरवणे ही माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाची बाब आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकावर ब-याच सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौलीक अशा सुचना मांडल्यात. यासर्व सुचनांचा विचार करता प्रामुख्याने चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या उत्पन्नापासून संभावित जमा व प्रलंबित अनुदाने प्राप्त करुन त्यातून उपलब्ध होणारा निधी आणि या उपलब्ध होणा-या निधीतून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम ही नागरी हिताच्या कामांसाठी उपलब्ध होणार आहे. कमी अधिक प्रमाणात बांधील खर्चात वाढ होत असल्याने दिवसेंदिवस नागरी कामासाठी निधी मर्यादित स्वरुपात उपलब्ध होत आहे. तेव्हा सध्याच्या उत्पन्न मार्गाव्यतिरीक्त उत्पन्न वाढीच्या अन्य मार्गांचाही विचार करणे याचबरोबर बांधील खर्चाचे प्रमाण कमीत कमी कसे राहील यासाठी देखील विचार करणे गरजेचे झाले आहे.

नाशिक शहराच्या कक्षा सातत्याने रुंदावत आहेत त्यामुळे नागरी सुविधा, वाहतुक नियमनाच्या बाबतीतही वाढ होत आहे. त्याचबरोबर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मनपाच्या मालकीच्या जागेत मोठया स्वरुपाची व्यापारी संकुले, वाहनतळे उभारल्यास त्या माध्यमातून कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल. भूसंपादनासाठी मनपास मोठया स्वरुपात निधी खर्च करावा लागतो तेव्हा अशा भूसंपादीत जागेवरील वास्तू/जागा इ.च्या माध्यमातून मनपास मिळणा-या उत्पन्नातही वाढ होणेचे दृष्टीने प्रयत्न करणे क्रमप्राप्त झाले आहे.

प्रभागातील नागरी विकासाची कामे ही त्या-त्या सदस्यांनी प्रस्तावीत केली आहेत त्या व्यतिरीक्त नागरी विकासाची सार्वजनिक कामे यांचा देखील अर्थसंकल्पात समावेश करणे आणि त्यासाठी आर्थिक तरतूद करणे या गोष्टी क्रमप्राप्त आहेत. यात प्रामुख्याने शहराच्या विविध भागातील विविध योजनांसाठी आवश्यक ती तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे.

नागरी विकासाच्या सर्व योजनांसाठी व प्रभागातील कामांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा यासाठी म्हणजेच उत्पन्न वाढीच्यादृष्टीने विशेष लक्ष देणेत येईल. त्याचप्रमाणे नागरिकांच्या आणि शहर विकासासाठी काही योजना/प्रकल्पांसाठी या अर्थ संकल्पात तरतूद केली त्यातील काही प्रकल्प/योजना पुढीलप्रमाणे –

१. नमामी गंगेच्या धर्तीवर मा.केंद्रसरकार कडे पाठपुरावा करुन गोदावरीच्या (गंगेच्या) स्वच्छतेसाठी केंद्राकडे पाठपुरावा सुरु आहे, जणेकरुन शहरातील सर्व नाल्यांचे पाणी बारामाही न वाहता पावसाळयातच वाहतील त्यासाठी समांतर पाईप लाईन टाकून ते पाणी नदीत थेट न जाता जलशुध्दीकरण केंद्राव्दारे पुर्नवापरासाठी नदीत सोडण्याकामी मा.पंतप्रधान कार्यालय यांचेकडे पाठपुरावा करणेत येत आहे.

२. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांची कर्मभुमी नाशिक असल्याने आणि सन २०२० हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कार्याची ओळख संपुर्ण जगाला व्हावी याकरीता फाळके स्मारकची निर्मिती केली आहे त्यांना मानवंदना म्हणुन फाळके स्मारक येथे पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी अंदाजपत्रकात तशी तरतूद करणेत येत आहे. तसेच फाळके स्मारकाची निमींती होउन बराच कालावधी लोटला असल्याने त्याची आजमितीस ब–याच प्रमाणात दुरावस्था झालेली असल्याने त्यास गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी सुशोभिकरण करणेकामी त्या क्षेत्रातील तज्ञ व जाणकार व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करण्यात येउन गत वैभव प्राप्त करुन देणे व त्याची देखभाल दुरुस्ती करीता अर्थसंकल्पात भरीव तरतुद करणेत येत आहे.

३. नाशिक शहराची वाढती लोकसंख्या व त्यानुसार विकसीत होणारी नागरी वस्ती आणि शहरातील मुख्य रस्ते (डीपी रोड) व अंतर्गत रस्ते (कॉलनी रस्ते) यांचा विस्तार बघता महानगरपालिका सफाई कर्मचारी यांची संख्या अपुरी असल्याने व स्वछ शहर केंद्र बिंदु मानुन नाशिक शहराच्या स्वच्छतेबाबत प्राधान्याने विशेष काळजी घेत आहेात, शहरातील मुख्य रस्ते स्वच्छता उपाययोजना अंतर्गत स्वीपींग मशिन व्दारे रस्ते स्वच्छ करणे अंत्यंत आवश्यक व गरजेची बाब आहे तसेच रस्त्याच्या कडेला व मोकळया जागेत रॅबीटची विल्हेवाट योग्य रितीने लावणे हीपण एक गरजेची बाब आहे. त्याकरीता अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुद केलेली आहे.

४. शहरातील गोठयांचा प्रश्न बिकट झाला असून गोठयांचे मलमुत्र मनपाचे ड्रेनेज लाईनमध्ये सोडण्यात येते त्यामुळे ड्रेनेज लाईन चोकप होउन ते पाणी रस्त्यांवर वाहते त्याकारणाने डासांची उत्पती होउन रोगराई वाढते त्याकारणाने गोठयांकरीता स्वतंत्र झोन तयार करुन मलमुत्राचे शुध्दीकरण करणे बाबत उपाय योजना करणेत येतील

५. शहरातील डेंग्यु,मलेरिया अन्य साथरोग व संसंर्गजन्य रोग यांवर प्रतिबंधात्मक प्रभावी उपाय योजना तसेच अशा रुग्णांकरीता पुणे,मुंबईच्या धर्तीवर स्वतंत्रपणे संसंर्गजन्य साथरोगासाठी स्वतंत्र हॉस्पिटलची निर्मिती करणेत येईल.

६. मा.केंद्र शासनाच्या माध्यमातून नाशिक शहरात मोठया स्वरुपाचे हॉस्पिटल नसल्याने दिल्ली येथील एम्स हॉस्पिटलच्या धर्तीवर शहरात अदययावत सर्व सोयींयुक्त हॉस्पिटलची उभारणी करणेकामी मा.केंद्र शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील.

७. शहरातील मोकाट जनावरांमुळे रस्ता वाहतुकीस मोठा अडथळा होत असुन व त्यांच्या मलमुत्रामुळे रस्ते अस्वच्छ व विद्रुप दिसत असल्याने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणेकामी स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करुन प्रश्न मार्गी लावणेत येईल.

८. नाशिक शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता आवश्यक असलेला मुबलक व स्वच्छ पाणी केंद्रशासनाच्या अमृत योजनेतून पाणी पुरवठयाच्या कामांकरीता र.रु.२२५ कोटींचा प्रस्ताव प्रशासनामार्फत पाठविण्यात आलेला असुन सदरचे प्रकरणाची प्रलंबीत असलेली फाईल पाठपुरावा करुन मंजूर करुन घेण्यात येईल.

९. नाशिक महानगरपालिकेच्या स्थापनेपासुन मंजूर विकास आराखडयात वाहतुकीसाठी असलेले रस्ते हे बहुतांशी दुरुस्ती, रुंदीकरण करणे तसेच ज्याठिकाणी डीपी रस्ता तयार करण्यात आलेला नाही अशा ठिकाणी आजपर्यंत न झालेले डी पी रस्ते पुर्ण क्षमतेने (बांधणेसाठी) तयार करणेसाठी कर्जरोखे किंवा डिफर पेमेंटच्या बाबतीत विचार करुन शहराच्या विकासात व सौंदर्यात भर घालण्यात येईल.

१०. शहराचा वाढता विकास लक्षात घेता असलेल्या जुन्या भाजी बाजारांव्यतीरीक्त शहरातील अत्यावश्यक ठीकाणी सुसज्ज व सर्वसोयींयुक्त भाजी मार्केटची उभारणी करणे कामी आर्थिक तरतुद करण्यात येत आहे.

११. शहरातील चारचाकी/ दुचाकी वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली असल्याने बाजारपेठ परिसरात वाहन पार्कींगमुळे रस्ता

वाहतुकीस अडथळा येउन ब–याच ठिकाणी वाहतुक खोळंबा परिस्थिती उदभवत असल्याने आवश्यक बाजारपेठ व इतर ठिकाणी बहुमजली वाहनतळ उभारणीकामी आर्थिक तरतुद धरण्यात येत आहे.

१२. नाशिक तिर्थक्षेत्र म्हणुन प्रसिध्द आहेच त्याच बरोबर शहरातील प्रेक्षणीय स्थळे व इतर माहिती येणा–या पर्यटकाला व्हावी यासाठी रेल्वे स्टेशन,बस स्टेशन व मध्यवर्ती ठिकाणी पर्यटन मदत केंद्र हे व्यावसायीक व उदयोजक यांचे सहकार्याने सी.एस.आर.निधी अंतर्गत उभारणेकामी चालना देणेत येणार आहे.

१३. शहरातील छोटे व मोठे उदयोग धंदे,व्यावसायीक आस्थापना,शैक्षणीक संस्था इत्यादी संबधीत माहीती उपलब्ध होणे तसेच देशातील व जगातील महत्वाचे शहरातील माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी आय.टी.पार्क उभारणे आवश्यक असुन त्यामाध्यमातुन मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असल्याने प्राधान्याने प्रयत्न केले जाणार आहे.

१४. शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेले पंचवटी मधील परशराम पुरीया पार्क येथे आकर्षक अश्वारुढ असलेला महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी तरतूद करण्यात येत आहे.

१५. शहरातील वाढत्या लोकसंखेमुळे तसेच कोरोना संसंर्ग प्रादुर्भाव लक्षात घेता मनपा रुग्णालयांसाठी अदयावत १५ ॲम्ब्युलन्सची नितांत आवश्यकता असल्याने त्या खरेदी करणेकामी तरतुद धरणेत येत आहे.

१६. संसर्गजन्य व असंसंर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शहरातील २०,००० नागरीकांचे प्रायोगीक तत्वावर एम डी डॉक्टर्स कडुन तपासणी करुन त्यांची माहीती जतन करणे तसेच शहरातील नागरीकांसाठी आरोग्य शिबीरे आयोजित करुन त्यांच्या आरोग्याची माहिती संकलीत करुन मनपा वैदयकीय विभागात जतन करणे याचा फायदा आपत्तकालीन परिस्थितीत होणार आहे ही योजना मनपातील इतिहासात पहिल्यांदाच राबविण्यात येणार आहे.

१७. कोरोना आजाराचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी,नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात उपाययोजना करणे अंतर्गत विलगीकरण कक्ष उभारणे अतिशय आवश्यक आहे. त्याचबरोबर जागोजागी स्क्रिनींग स्पॉटस् देणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, मॉल्स स्क्रिनींग व इतर अत्यावश्यक उपाययोजना करणेकामी तरतुद धरणेत येत आहे.

१८. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व अन्य उपाययोजनांसाठी अर्थसंकल्पात विशेष अशी भरीव तरतुद धरणेत येत आहे.

१९. शहरातील नव्याने तयार झालेले मनपा दवाखाने अदयावत करुन सुरु करणे कामी साहीत्य,उपकरणे व मनुष्यबळ तसेच दवाखाना देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतुद करणेत येत आहे.

२०. नाशिक शहर हे धार्मिक स्थळ असल्याने धार्मिक कार्यक्रम मोठया प्रमाणात होत असतात तसेच सभा संम्मेलनेही होत असल्याने सार्वजनिक स्वच्छता रहावी याकरीता १० मोबाईल टॉयलेट व्हॅन आवश्यक असल्याने त्या खरेदी करणेकामी तरतुद धरणेत येत आहे.

२१. नाशिक शहरातील महिलांसाठी औदयोगिक प्रशिक्षण देणेकामी नाशिक महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रयत्न करणेत येईल व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद धरणेत येत आहे.

२२. शहरातील विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरावस्था झालेली असल्याने ई–टॉयलेट उभारणेत येऊन सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न सोडविणेकामी अर्थसंकल्पात तरतुद धरणेत येत आहे.

२३. महानगरपालिका हददीत महिलांकरीता असलेल्या सार्वजनिक स्वच्छता गृहात सॅनिटरी मशिन असणे अत्यंत आवश्यक असल्याने तरतुद धरणेत येत आहे.

२४. महिला बाल कल्याण विभागांतर्गत मागील ५ वर्षापासुन बंद पडलेल्या प्रकल्पातंर्गत नाशिक शहरातील ११,००० महिला व मुलींना स्वयंरोजगारांतर्गत १९ प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे त्यामुळे महिला बेरोजगारांना याचा मोठया प्रमाणात फायदा होणार आहे.

२५. नाशिक पुर्व विभागांतर्गत गाडगे महाराज वसाहतीस संरक्षण भिंत बांधणे कामी तरतुद धरणेत येत आहे.

२६. नाशिक पुर्व विभागीय कार्यालय (मेनरोड ऑफिस) सध्यस्थितीत बरेच जुने झाले असुन कार्यालयात येणा–या नागरीकांसाठी, पदाधिकारी,अधिकारी /कर्मचारी यांचे साठी गैरसोयीचे होत असुन मुख्य बाजारपेठ असल्याने वाहन पार्कींगचीही समस्या उदभवत असल्याने व्दारका येथील मनपा आरक्षित जागेवर सुसज्ज नाशिक पुर्व विभागीय कार्यालय बांधणेकामी तरतुद धरणेत येत आहे.

२७. नविन नाशिक,वाढती लोक संख्या लक्षात घेता राजीव नगर येथे जलतरण तलाव बांधणे करीता तरतुद धरण्यात येत आहे.

२८. धार्मिक विधीसाठी येणा–या भारतभरातुन नागरीकांसाठी रामकुंड परिसरात सभामंडप उभारणे कामी तरतुद करणेत येत आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन २०२०–२०२१ चा अर्थसंकल्प तयार करतांना देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री जे. पी.नडडा, केंद्रीय गृहमंत्री मा. श्री.अमितजी शहा, केंद्रीय रस्ते आणि परिवहनमंत्री मा.श्री.नितीनजी गडकरी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. उध्दवजी ठाकरे, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा मा. श्री.देवेंद्रजी फडणवीस, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील,. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य,तथा पालकमंत्री,नाशिक मा.ना.श्री.छगनरावजी भुजबळ ,माजी पालकमंत्री मा.आ.श्री गिरीषजी महाजन, प्रदेश संघटनमंत्री महाराष्ट्र मा.श्री विजयराव पुराणीक, सहसंघटन मंत्री मा.श्री. किशोरजी काळकर, चिटणीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश मा.लक्ष्मणराव सावजी, प्रदेश उपाध्यक्ष भाजपा,मा.श्री वंसंतरावजी गिते व मा.श्री सुनिलभाऊ बागुल, शहर अध्यक्ष मा.श्री गिरीशजी पालवे, जेष्ठनेते मा. श्री विजयरावजी साने, मा.आ.प्रा.सौ.देवयानी फरांदे, मा. आ. सौ. सिमाताई हिरे, मा.आ.श्री राहुल ढिकले यांचे सहकार्य लाभले तसेच उपमहापौर मा.,श्रीम. भिकुबाई बागुल स्थायी समिती सभापती मा.श्री गणेश गिते, मा. आयुक्त श्री. राधाकृष्ण गमे सभागृह नेते मा. श्री. सतिश (बापु) सोनवणे, विरोधी पक्षनेते मा. श्री. अजय बोरस्ते, भाजपा गटनेते मा. श्री.जगदिश पाटील, शिवसेना गटनेते मा. श्री. विलास शिंदे, काँग्रेस गटनेते मा. श्री. शाहु खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते मा. श्री. गजानन शेलार, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटनेते मा.सौ नंदीनी बोडके , आर.पी.आय. (अे) गटनेते मा. सौ. दिक्षाताई लोंढे तसेच मनपा पदाधिकारी तसेच सर्व पक्षांचे ज्येष्ठ पदाधिकारी मनपा सभागृहातील सर्व सदस्य, शहरातील विकास कामासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटना आणि त्यांचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, सर्व वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांचे संपादक, पत्रकार, छायाचित्रकार, प्रतिनिधी तसेच नाशिक महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचे नाशिक शहराच्या विकासाच्या दृष्टीने मला सहकार्य लाभत आहे.

महानगरपालिकेची ध्येय, धोरणे प्रत्यक्षात राबविणेकामी निश्चितच मला सर्वांचे सहकार्य आहे. त्याचप्रमाणे, शहरातील नागरिकांचे प्रेम, सदिच्छा आणि सातत्याने सहकार्य असल्यामुळे या शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त वेळ काम करण्याकरिता प्रोत्साहन मिळत आहे. तसेच ते भविष्यातही मिळेल अशी आशा व्यक्त करतो आणि माझे निवेदन पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र!!

सतिश (नाना) लक्ष्मणराव कुलकर्णी
महापौर,
नाशिक महानगरपालिका नाशिक

सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक
'अ', 'क' आणि 'प' बाबत
मा.सभापती, स्थायी समिती यांचे निवेदन



सन्माननीय महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व गटनेते, सर्व प्रभाग समिती सभापती, महिला व बालकल्याण समिती सभापती, सहकारी स्थायी समिती सदस्य आणि मान्यवर सहकारी नगरसेवक बंधु व भगिनींनो,

सन २०१९-२० या वर्षात स्थायी समिती सभापती म्हणुन माझी निवड झाली त्यामुळे मला सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक तयार करण्याची संधी मिळाली.

नाशिक महानगरपालिका लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सहाव्या कालखंडातील तीस-या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्याची संधी देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.उध्दवजी ठाकरे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील, उपमुख्यमंत्री मा.श्री.अजितदादापवार, म.न.से. अध्यक्ष मा.श्री.राजसाहेब ठाकरे, नाशिकचे पालकमंत्री मा.ना.श्री.छगनरावजी भुजबळ, मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, विरोधी पक्षनेता, मा.ना.श्री. दादा भुसे, कृषीमंत्री, मा.श्री.गिरीष महाजन, संघटन मंत्री मा.श्री. किशोर काळकर, मा.खा.श्री.हेमंत (आप्पा) गोडसे, मा.खा. सौ.भारतीताई पवार, शहराध्यक्ष श्री.गिरीषजी पालवे, मा.आ.सौ.देवयानी फरांदे, मा.आ.सौ.सीमाताई हिरे, मा.आ.ॲड. श्री.राहुल ढिकले, यांच्या सहकार्याने मला प्राप्त झाले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या जमा खर्चाच्या आकडेवारीनुसार कलम ९६ अन्वये स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केले आहे.

मा.आयुक्त सो.यांनी सन २०२०-२१ आर्थिक अपेक्षित जमा रुपये २१६१.७९ कोटी धरुन त्यानुसार जमा व खर्चाची आकडेवारी विषद केली आहे. मा.स्थायी समिती सभेमध्ये या विषयी चर्चा होऊन उत्पन्नामध्ये र.रु. २२८.५५ कोटींची वाढ अपेक्षित धरली आहे. शहराच्या विकासाकरीता मुलभुत सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच नागरीकांवर अतिरिक्त बोजा पडु नये याची काळजी अर्थसंकल्पात घेतली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता सन २०२०-२१ या वर्षासाठी अपेक्षित जमा र.रु.२३९०.३४ कोटी व अपेक्षित खर्च र.रु. २३८९.०३ कोटी गृहीत धरुन र.रु.१.३० कोटीचे शिल्लकी अंदाजपत्रक तयार करणेत येत आहे.

नाशिक शहरातील नागरीकांवर घरपटटी, पाणी पटटीत कुठल्याही प्रकारची दरवाढ करण्यांत आलेली नाही. अर्थसंकल्पात प्रामुख्याने त्या-त्या कामांसाठी आर्थिक तरतुद केल्या आहेत. विशेषत: त्यात खालील विकास कामांच्या बाबींसाठी आर्थिक तरतुद केली आहे त्या बाबी पुढीलप्रमाणे,

- शहरातील वाढती रहदारी लक्षांत घेता नाशिक शहरात विविध ठिकाणी असलेले पार्किंगसाठीचे रिझर्व्हेशन देखील बी.ओ.टी.तत्वावर विकसित करण्याचा मानस आहे जेणेकरुन मनपाच्या तिजोरीवर कोणताही बोजा न पडता पार्किंगची व्यवस्था होईल.
- तसेच यावर्षी र.रु.१५०.०० कोटी कर्ज रोखे काढणार असुन सदर कर्जातुन नाशिक शहरातील मुख्य रिंगरोड, डी.पी.रोड विकसित करणेसाठी सदरच्या निधीचा उपयोग होणार आहे.
- <u>प्रभाग विकास कामे /खेडे विकास निधी</u> - नाशिक शहरातील एकुण ३१ प्रभागामध्ये प्रत्येक नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील/वॉर्डातील विविध विकास कामे करणेसाठी तरतुद करण्यांत आलेली आहे.

- रस्ते बांधणे – नाशिक शहरातील विविध महत्वाचे रस्ते बांधणे/काँक्रिटीकरण करणेसाठी तरतुद करणेत आलेली आहे.
- इमारत बांधणे – नाशिक महानगरपालिका क्षेत्रात पुल, सांडवे व रस्ते बांधणे व खडीकरण करणे तसेच इतर ठिकाणी इमारत बांधणे याकामी ''इमारत बांधणे'' या सदरी तरतुद करण्यांत आलेली आहे.
- जलकुंभ बांधणे – नाशिक शहराची लोकसंख्या विचारात घेता तसेच नव–नविन वसाहत होत असुन त्याकामी मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करणेकामी तरतुद करण्यांत आलेली आहे.
- फाळके स्मारक नुतनीकरण करणे – नाशिक शहरातील पांडवलेण्याच्या पायथ्याशी असलेले पर्यटनस्थळ म्हणुन ओळखले जाणारे फाळके स्मारक येथे पर्यटकांची संख्या वाढविणेसाठी तसेच लहान मुलांचे मनोरंजनासाठी खेळणी उपलब्ध करुन देणे जेणेकरुन मनपाचे आर्थिक उत्पन्नातही वाढ होणेस मदत होणार असल्याने फाळकेस्मारकाचे नुतनीकरणासाठी अंदाजपत्रकात निधी धरण्यांत आलेला आहे.
- शहरातील असलेले स्लॉटर हाऊसचे दुरुस्ती करण्यांत येणार असुन सदर कामी तरतुद करण्यांत आलेली आहे.
- शहरात मध्यवर्ती ठिकाणी महिलांसाठी टॉयलेट उभारणी करणेत येणार असुन त्याकामी तरतुदकरण्यांत आलेली आहे.
- औरंगाबाद रोड येथील निलगिरीबाग येथील आरक्षित असलेल्या जागेवर खेळाचे मैदान तयार करणे (कंपाऊंड वॉल बांधणे, शौचालय/बाथरुम बांधणे) कामी तरतुदी करणेत आलेली आहे.
- नाशिक शहरातील गोदावरी नदीवर होळकर पुलाजवळ बी.ओ.टी. तत्वावर बोट क्लब सुरु करणेत येणार आहे.
- द्वारका येथे बी.ओ.टी.तत्वावर संकुल बांधणे.
- भद्रकाली येथील मार्केट विकसित करणे.
- आडगांव येथे ट्रक टर्मिनल येथे टेक्सटाईल मार्केट तयार करणे.
- तपोवन येथे रामसृष्टी विकसीत करणे.
- फाळके स्मारकामध्ये सुविधा उपलब्ध करणे.
- गरीबांसाठी जनऔषधी सेवा सुरु करणे –भारतीय प्रधानमंत्री जनऔषधी योजना केंद्र शासनामार्फत देशभरात राबविणेत येत आहे. त्या अनुषंगाने, नाशिक महानगरपालिका अंतर्गत येणा–या रुग्णालयात प्रधानमंत्री जनऔषधी योजना सुरु करणेकामी पुअर पिपल्स वेल्फेअर या सोसायटी मार्फत मनपा दवाखाने व रुग्णालयात १२० चौ.फुट जागा भाडेतत्वावर देण्यांत येणार आहे. त्यामुळे रुग्णालयात येणा–या समाजातील वंचित,गरीब,गरजु जनतेस वाजवी दरात औषधे उपलब्ध होणार आहे. या बाबत महासभेत ठराव सुध्दा पारीत झालेला आहे.
- भुसंपादनाचे पैसे सर्व नगरसेवक/नगरसेविकांना प्रभाग विकास कामांसाठी वर्ग केलेले आहे, त्यामुळे सर्व प्रभागात समान विकास होऊन सर्व नागरीकांसाठी रस्ते व इतर विकास कामे करता येतील.
- उद्यान विकास/खेळणी बसविणे – मनपा क्षेत्रात नविन वसाहतीमध्ये उद्यान विकसित करणेस तसेच सदर उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी व बेंचेस बसविणे, तसेच मनपा क्षेत्रातील उद्यानांची देखभाल करणेकामी तरतुद करण्यांत आली आहे.

उपरोक्त बाबींबरोबर सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांचा हि अंतर्भाव होणे अपेक्षित आहे.तसेच, यावर्षी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर नॅशनल स्कील डेव्हल्प्मेंट कॉर्पोरेशन व नॅशनल युवा को–ऑप.सोसायटी मार्फत घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत येणारे कंत्राटी सेवक, कचरा वेचक, घंटागाडी कर्मचारी तसेच पेस्ट कंट्रोल कर्मचारी व तदनुशंगिक काम करणारे कर्मचाऱ्यांना मा.केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सफाई कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी करणे विषयी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यांत येणार आहे.

अर्थसंकल्प तयार करतांना मान्यता महापौर मा. सतिश (नाना) कुलकर्णी, उपमहापौर मा.भिकुबाई बागुल, सभागृहनेता मा.सतिश सोनवणे, विरोधी पक्ष नेता मा.अजय बोरस्ते, भाजपा गटनेते मा.जगदीश पाटील, शिवसेना गटनेते मा.विलास शिंदे, काँग्रेस गटनेते मा.शाहु खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते मा.गजानन शेलार, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटनेत्या मा.नंदिनी बोडके, आर.पी.आय.(अे) गटनेते मा.दिक्षाताई लोंढे, महापालिका आयुक्त मा.राधाकृष्ण गमे, तसेच सर्व स्थायी समिती सदस्य, नगरसेवक, अधिकारी व वृत्तवाहिनी प्रतिनिधी आणि पत्रकार तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरीक यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबददल आभार मानून सन २०२०–२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास अंतिम मान्यता द्यावी अशी मी सन्माननीय सभागृहास विनंती करतो.

जय हिंद!! जय महाराष्ट्र!!

(उद्धव बाबुराव निमसे)
सभापती, स्थायी समिती,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक
सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक
महापालिका आयुक्तांचे निवेदन

सन्माननीय सभापती, स्थायी समितीचे सर्व सन्माननीय सदस्य व पत्रकार बंधू भगिनींनो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-95 अन्वये,नाशिक महापालिकेच्या जमा - खर्चाचे सन 2019-20 चे सुधारीत व 2020-21 चे मूळ अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे. सदर अंदाज तयार करत असतांना, महापालिकेस प्राप्त होणारे विविध कर, शुल्क, फी, अनुदाने व अन्य जमा लक्षात घेऊन, मनपा कार्यक्षेत्रात करावयाची विकास कामे व पुरवावयाच्या सेवांसाठी होणा-या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवून योग्य ताळमेळ घालणेचा प्रयत्न केलेला आहे.

शहरातील रस्ते,पदपथ,उड्डाणपूल,जलवाहिन्या,मलनि:स्सारण वाहिन्या, विद्युतीकरण,परिवहन,उद्यानविकास,शिक्षण,वैद्यकिय सेवा,घनकचरा व्यवस्थापन, इ.नागरी सुविधांची पूर्तता करतांना समतोल विकासाचा विचार करण्यात आला आहे. रहिवासी तरुण,प्रौढ, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, मागासवर्गीय, उद्योजक, नोकरदार अशा सर्वच घटकांना अपेक्षित सेवा-सुविधांची दर्जात्मक पूर्तता करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.तसेच ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन,सुलभ, पारदर्शक व गतिमान प्रशासकीय कामकाज करण्यावर भर देण्यात येत आहे.

सन **2019-20** चे सुधारीत अंदाजपत्रक

सन 2019-20 च्या मंजूर अर्थसंकल्पानुसार नोव्हेंबर 2019 पर्यंतच्या आठमाही कालावधीत प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच उर्वरित चार महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणारी जमा आणि विकास कामावरील खर्च गृहित धरुन,सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार रु.2086.36 कोटी आरंभीच्या शिल्लकेसह,रु.1601.15 कोटी जमा व रु.1767.38 कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन 2019-2020 च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार अखेरची शिल्लक रु. 318.98 कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक

सन 2020-21 या वर्षाचे अंदाज तयार करतांना, यापूर्वी हाती घेतलेल्या कामांचे दायित्व व जमा होणारा महसूल याचा वास्तववादी विचार करुन, जमा-खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

- उत्पन्नाच्या बाबी -

महापालिकेच्या महसुलामध्ये प्रामुख्याने जीएसटी अनुदान, मालमत्ता कर, नगररचना शुल्क व पाणीपट्टी यांचा समावेश आहे. तसेच मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व अन्य साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे.

<u>जीएसटी/स्थानिक संस्था कर</u> :

सन १८-19 प्रत्यक्ष	973.13
सन १९-20 सूधारीत	1024.53
सन २०-21 प्रस्तावित	1081.81

महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग-चार क्र.55 अन्वये वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे, महापालिका कार्यक्षेत्रातील जकात व स्थानिक संस्था कर रद्द करुन त्याच्या भरपाईपोटी जीएसटी अनुदान देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले

आहे. त्यानुसार सद्यस्थितीत दरमहा रु. 78.66 कोटी अनुदान (वार्षिक रु. 943.92 कोटी) प्राप्त होत आहे. सन 2020-21 करीता त्यामध्ये 8% वाढ गृहीत धरुन रु.1019.43 कोटी अनुदान प्राप्त होऊ शकेल. तसेच पुढील वर्षी शासनाकडून 1% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी रु. 60.00 कोटी प्राप्त होऊ शकतील. त्याचप्रमाणे सन 2019-20 या आर्थिक वर्षामध्ये प्रलंबित स्थानिक संस्था करनिर्धारणाचे काम पूर्ण करण्यात येणार असून, त्याद्वारे वार्षिक स्थानिक संस्था कर उत्पन्नात रु. 2.00 कोटी वाढ होण्याची शक्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे सन २०20-२1 मध्ये महानगरपालिकेस अंदाजे रु.1081.81 कोटी इतके उत्पन्न प्राप्त होईल.

<u>मालमत्ता कर :</u>

सन १८-19 प्रत्यक्ष	117.12
सन १९-20 सूधारीत	132.12
सन २०-21 प्रस्तावित	170.06
• मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकुण उत्पन्न	

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे अचूक व पूर्ण करनिर्धारण करणे आवश्यक आहे.शहरातील कोणतीही मालमत्ता कर आकारणीविना राहू नये, यादृष्टीने मालमत्ता सर्वेक्षणाचे काम हाती घेतले असून,सर्व मिळकतींचे जी.आय.एस. मॅपिंग करण्यात येत आहे. मिळकत सर्व्हेक्षणाचे काम अंतीम टप्प्यात आहे.तसेच जुन्या व नव्याने कर लागू होणा-या मिळकतींमधील वापर बदल,वाढीव बांधकामे,भाडेपट्टा इ.साठी वाढीव मालमत्ता कर लागू करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे सर्वेक्षणातील नवीन मिळकतींच्या भोगवटादारांना विशेष नोटीसा देण्यात येत आहेत. तसेच प्राप्त होणा-या हरकतींवर निर्णय घेण्यात येत आहे.

मालमत्ता कराच्या सुलभ भरण्यासाठी महापालिकेच्या २२ नागरी सुविधा केंद्रांमध्ये रोख,धनादेश,क्रेडिटकार्ड,डेबिटकार्ड यांद्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. www.nmctax.in या संकेतस्थळावर तसेच NMC e-Connect मोबाईल अॅपवर नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच थकबाकीदार मिळकतधारक यांना मालमत्ता कर भरणेबाबत SMS द्वारे प्रतिमहा सुचित करणेत येत आहे. त्याकरीता मिळकतधारक यांचे भ्रमणध्वनी क्रमांकाची नोंद संगणकावर घेणेत आलेली आहे. मालमत्ता कराचा भरणा मालमत्ताकर थकबाकी ना-हरकत दाखला, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र, वारसा हक्क मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र, डिमांड उतारा, रिव्हीजन उतारा या ई-सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या इमारतींना मालमत्ता कर त्वरीत लागु करणे होणेकामी नगरनियोजन विभागाचे AUTO DCR हे मालमत्ता कर संगणकिय अज्ञावलीशी संलग्न करणेत आलेले आहे. मालमत्ता कर वसुलीकरीता एक रकमी भरणा करणाऱ्यां थकबाकीदाराकरीता, अभय योजना राबविणेत होती. त्यामधुन समारे 72498मिळकत धारकांनी त्याचा लाभ घेतला असून त्याअन्वये 44.28 कोटी वसुली झालेली आहे. सन 2020-2021 या आर्थिक वर्षापासुन अगाऊ भरणा करणारे करदात्यांकरीता माहे एप्रिल-5 टक्के, माहे मे-3 टक्के व माहे जुन-2 टक्के इ.मनपा करांवर सुट/सवलत सुरु करणेत येणार आहे तसेच ऑनलाईन भरणा करणारे कर दात्यांकरीता 1 टक्का व जास्तीत जास्त र.रु.1000 पर्यंत मनपा करांवर सुट/सवलत देण्यात येणार आहे.

नगररचना शुल्क :

नगर नियोजन विभागामार्फत प्रामुख्याने बांधकाम परवानगी,भोगवटा दाखला, तात्पुरता/अंतिम अभिन्यास व झोनिंग दाखले या सेवांकरीता शुल्क आकारणी करण्यात येते.नाशिक शहराच्या विकास योजना आराखडयास मंजुरी प्राप्त असुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली देखिल मंजुर झालेली आहे.त्या अन्वये अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (Premium Paid F.S.I.) तसेच रस्ता रुंदीकरणानुसार वाढीव टी.डी.आर.व वाढीव एफ.एस.आय.अनुज्ञेय असुन टी.डी.आर.वापराकरीता 5 % पायाभुत सुविधा शुल्क लागु करण्यात आलेली आहे.तसेच नगर नियोजन विभागा मार्फत नागरीकांसाठी पंतप्रधान आवास योजना,रमाई आवास योजना याव्दारे बांधकाम परवानगीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.त्याचप्रमाणे नागरीकां साठी ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन भोगवटा दाखला ज्या दिवशी नगर नियोजन विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल त्याच दिवसापासुन नागरीकांना ई-सेवा व्दारे ऑनलाईन भोगवटा दाखल्याची माहिती प्राप्त होण्यासाठी सुविधा लागु करण्यात आलेली आहे.त्यामुळे नागरीकांना ऑनलाईन कर आकारणी करुन त्यापासुन कर भरण्यास सवलत उपलब्ध झालेली आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	65.70
सन १९-20 सूधारीत	267.02
सन २०-21 प्रस्तावित	350.86
* मनपा स्व:उत्पन्न व मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बांधकाम खर्चावर आधारीत उपकर सहित एकुण उत्पन्न	

सन-2019-2020 या अर्थिक वर्षात टी.डी.आर.व वाढीव एफ.एस.आय.मुळे कमाल इमारत क्षमता वाढणार असल्याने उत्पन्न वाढीस मदत झालेली आहे.तथापी मनपामार्फत नियमानुसार बांधकाम परवानगी घेतलेल्या तथापी वाढीव बांधकाम केलेल्या इमारतींना दंडात्मक आकारणी करुन हार्डशिप प्रिमीयम आकारुन परवानगी देण्यात आलेली आहे.त्यानुसार हया वर्षी जानेवारी अखेर हार्डशिप प्रिमीयम इत्यादीच्या माध्यमातुन सन-2019-2020 मध्ये रक्कम रुपये 218.00 कोटी रुपये उद्दीष्ट दिलेले होते त्यापैकी जानेवारी-2020 अखेर पावेतो रक्कम रुपये 195.00 कोटी इतके उत्पन्न नगर नियेाजन विभागामार्फत मनपास प्राप्त झालेले आहे व मार्च अखेर पावेतो 50.00 कोटी इतके उत्पन्न अपेक्षीत आहे.

पाणीपट्टी :

नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. शहरास प्रामुख्याने गंगापूर धरण व दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यावरुन पाणी पुरवठा होतो. तथापि भविष्यातील निकड लक्षात घेता पाणी पुरवठयाच्या दृष्टीने मुकणे धरणातून पाणी पुरवठयाचे नियोजन करण्यात येत आहे. हिशोबबाहय पाण्यावरील नियंत्रणाकरीता अनधिकृत नळजोडण्या खंडीत करण्याची धडक मोहीम हाती घेण्यात येत आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	44.11
सन १९-20 सूधारीत	55.00
सन २०-21 प्रस्तावित	65.00

पाणी पुरवठा यंत्रणा "ना-नफा, ना-तोटा' तत्वावर चालविणेच्या दृष्टीने पाणी उत्पादन खर्चाइतका उपभोक्ता आकार (पाणीदर) लावणे आवश्यक आहे.शासन मार्गदर्शक सूचनांनुसार व्हॅल्युमेट्रीक पध्दतीने पाणीपट्टी दर आकारणी गरजेची आहे. तसेच टेलिस्कोपिक रेट व इक्विटेबल ॲक्सेस तत्वानुसार नवीन पाणीदर आकारणी करणे आवश्यक आहे. पाणीपट्टी दर वसूलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जलगळती थांबविणे, एन.आर.डब्ल्यू. कमी करणे, अनधिकृत नळ जोडणीवर कारवाई करणे व पाणीपट्टीची थकबाकी वसूल करणे या उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे.

जाहिरात व परवाने विभाग :

सन १८-19 प्रत्यक्ष	8.48
सन १९-20 सूधारीत	8.00
सन २०-21 प्रस्तावित	12.00

महानगरपालिका मालकीचे एकुण 61 शॉपिंग सेंटर असुन त्यामध्ये 2074 गाळे व 856 ओटे आहेत. सदर गाळयांचे जागा लायसन्स फी मध्ये शीघ्रगणक दराने वाढ केलेनुसार माहे डिसेंबर 2019 अखेर वसुली र.रु. 468.68 लाख झालेली आहे.

तसेच,सदर गाळयांची मागणी,वसूली व थकबाकीची अद्यावत माहिती उपलब्ध होणेकामी व गाळेधारकांना विनाविलंब देयके पोहोचणे कामी संगणीकरण आज्ञावली कार्यान्वित करणेत आलेली असून,मागणी देयकाव्दारे वसूलीचे प्रमाण वाढविण्याचा मानस आहे. सदर शॉपिंग सेंटरमधील गाळेधारकांना आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा पुरविणेत येणार असून, सदरचे गाळे बाजारभावाप्रमाणे ई-लिलावाव्दारे देणेत येणार आहे. जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल.

व्यवसाय परवान्यांप्रमाणेच शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातुन विविध जाहीरात माध्यमे (Hoarding) उभारणेबाबत तसेच विदयुत खांबांवर जाहिरात करणेबाबतची निविदा प्रक्रिया राबवून महानगरपालिकेस भरीव उत्पन्न प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला जात आहे.महानगरपालिकेच्या विदयुत खांबांवर अनाधिकृत केबल टाकण्यात येतात.सदर केबलधारकांकडून अधिकृतपणे विदयुत खांब वापरण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव मा.महासभेवर ठेवण्यात आलेला आहे. तसेच मनपाचे मालकीचे अधिकृत जाहीरात होर्डीग करीता नव्याने जागा शोधुन त्याव्दारे मनपाचे उत्पन्न वाढविणेचे प्रयत्न केले जाणार असुन नव्या जागा शोधतांना शहर विद्रुपीकरण होणार नाही याची देखील काळजी घेतली जाणार आहे. तसेच,अनधिकृत जाहीरात होर्डीग शोधुन त्यांच्यावर दंडात्मक स्वरुपाची तसेच ते अतिक्रमण विभागाच्या मदतीने हटविणेबाबतची कारवाई प्रस्तावित असुन शहरातील अनधिकृत होर्डीगमुळे होणारे विद्रुपीकरण थांबविले जाणार आहे. जाहीरात होर्डीगच्या परवानाकरीता ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 313,अन्वये महानगर पालिका क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक आहे. तथापि,आतापर्यंत अशा परवाना शुल्काची आकारणी करणेत आलेली नाही. तरी,या वर्षांत परवाना शुल्काचे वसुलीची अंमलबजावणी करणेत येणार असुन त्याव्दारे महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त होणार आहे. व्यवसाय परवाना देण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्यासाठी, सदर परवाने नुतनीकरण करण्यासाठी ऑनलाईनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ऑनलाईन परवाने देतांना नागरिकांना सुलभ व्हावे याकरीता आवश्यक कागदपत्रांची संख्या मोजकीच ठेवण्यात आलेली आहे. महापालिका क्षेत्रात असलेल्या बाजार पावती वसुली, मनपाचे तरण तलाव, नाट्यगृह, फाळके स्मारक, तारांगण इ. ठिकाणी POS मशिन अथवा ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

खर्चाच्या बाबी

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना आधुनिक सोयी सुविधांयुक्त रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वैदयकीय रुग्णालये, सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन,नदी स्वच्छता,परिवहन सेवा, उद्याने, क्रिडांगणे, महिलांसाठी सुविधा इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम :

मुख्य रस्ते/अंतर्गत रस्ते विकसित करणे :

महापालिका क्षेत्रातील रस्त्यांचे अस्तरिकरण करणे, खडीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे व नव्याने विकसित झालेल्या वसाहतींमध्ये कामाची निकड, निधीची उपलब्धता व तांत्रिक मान्यता या त्रिसुत्रीद्वारे रस्ते तयार करण्याचे नियोजन आहे. तसेच सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतींमधील रस्त्यांची सुरु असलेली कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यांची कामे करतांना विकास आराखडयानुसार रुंदी व मंजूर ले-आऊट मधील रत्यांची रुंदीचा (Right of Way) विचार करणे गरजेचे आहे. तसेच आवश्यक गाडीमार्गाची रुंदी (Carriage Way), पाणी निचरा जलनि:स्सारण व्यवस्था, युटीलिटी डक्टस्, फुटपाथ इ. सुविधांचा अंतर्भाव करुन, शहर व आजूबाजूच्या खेडयातील नागरिकांना सुव्यवस्थित सुविधा देण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे प्राधान्याने जोडरस्ते (Missing Link) विकास करणेचे नियोजन करणेत येत आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	22.83
सन १९-20 सूधारीत	172.02
सन २०-21 प्रस्तावित	166.00
*भांडवली खर्च	

पुल व सांडवे बांधणे :

स्मार्ट सिटी ग्रीन फिल्ड प्रकल्पांतर्गत विकसित करणेत येणा-या भागासाठी पूल/उड्डाणपूल बांधणेची कामे हाती घेणेत येत आहे. याचबरोबर मनपा हद्दीतील विविध खेडयांमधील नाले,कॅनालच्या जागा यावरुन दळणवळण सुलभतेकरिता विविध ठिकाणी पुल व सांडवे बांधणे प्रस्तावित आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	1.54
सन १९-20 सूधारीत	10.00
सन २०-21 प्रस्तावित	18.00
*भांडवली खर्च	

शहर अडथळामुक्त (बॅरिअर फ्रि सिटी) उपाययोजना :

दिव्यांग व जेष्ठ नागरीकांना सार्वजनिक सेवा सुविधांचा सुलभतेने वापर करता येण्याच्या दृष्टीने, विविध उपाययोजना करणेचा मानस आहे. तसेच मनपा मुख्य कार्यालय व विभागीय कार्यालयांमध्ये सदर उपाययोजना पुर्ण करण्यात आलेल्या असून याबरोबरच शहरातील मुख्य रस्ते, चौक, फूटपाथ या ठिकाणी सुयोग्य नियोजन करुन, दिव्यांग व जेष्ठ नागरीकांना त्यांचा सुलभ वापर होण्याच्या दृष्टीने नियोजन करणेत येत आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	0.00
सन १९-20 सूधारीत	4.18
सन २०-21 प्रस्तावित	4.00
*भांडवली खर्च	

सायकल ट्रॅक विकसित करणे :

प्रायोगिक तत्वावर नाशिक (पश्चिम) विभागातील कृषीनगर येथे सुमारे 900 मीटर लांबीचा सायकल ट्रॅक विकसित करणेत आलेली आहे. सदर ट्रॅकच्या उपयुक्ततेनुसार शहराच्या अन्य भागांतही सायकल ट्रॅक विकसित करणेचे नियोजन आहे. सायकल ट्रॅकसह मुख्य रस्ते/नवीन रस्ते विकसित करणेचा मानस आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	1.28
सन १९-20 सूधारीत	0.01
सन २०-21 प्रस्तावित	1.20
*भांडवली खर्च	

मनपा इमारती व पार्किंग व्यवस्था :

स्मार्ट सिटी मार्फत महापालीकेचे मुख्य कार्यालय,राजीव गांधी भवन या इमारतीत पार्किंग व्यवस्था व कार्यालयांकरिता मा.महापौरांच्या रामायण बंगल्या जवळील जागेत पार्किंग करिता दोन तळमजले (Basement) व ऑफिसकरिता सुमारे 12 मजल्यांचे संकल्पचित्र तयार करुन प्रथम टप्प्यात त्यातील दोन मजले विकसित करण्याचे नियोजन आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	15.72
सन १९-20 सूधारीत	10.98
सन २०-21 प्रस्तावित	15.00
*भांडवली खर्च	

इमारत बांधणे :

नाशिकरोड विभागातील स.नं.117,पंचवटी विभागातील स.नं.211 येथे नाटयगृह बांधणे ही कामे लवकर पुर्ण करणेचे नियोजन आहे तसेच गंगापुर रोड येथील स.नं.450 येथे नाटयगृह बांधणेचे प्रस्तावित आहे..

व्यावसायिक मार्केट उभारणी :

सातपूर मधील छत्रपती शिवाजी मंडई मध्ये फळभाजी व्यवसायिकांसाठी नवीन ओटे बांधणे, तसेच गंगापुर रोड व आडगांव येथे नवीन प्रस्तावित मार्केट उभारणेचे नियोजन करणेत आलेले आहे.त्याच प्रमाणे जुन्या नाशिक मधील भद्रकाली मार्केटची दुरुस्ती प्रस्तावित आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	0.00
सन १९-20 सूधारीत	1.33
सन २०-21 प्रस्तावित	2.05
*भांडवली खर्च	

महिलांसाठी जलतरण तलाव बांधणे :

सातपुर एम.आय.डी.सी.मधील मनपाच्या क्लब हाऊस येथे महिलांसाठी स्वतंत्र जलतरण तलावाची निर्मिती करणेचे काम सुरु असून पंचवटी विभागात महिलांसाठी नविन तरणतलाव प्रस्तावित आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	10.02
सन १९-20 सूधारीत	23.80
सन २०-21 प्रस्तावित	28.20
*भांडवली खर्च	

क्रिडांगणे विकसित करणे :

महापालिका क्षेत्रातील सहा विभागांमध्ये सुरु असलेली क्रिडांगणांची कामे सुरु असून त्यासाठी वाढीव सुविधांकरिता नियोजन करणेत आलेले आहे. शासन निधीतून हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान (गोल्फ क्लब) विकसित करणे. तसेच खेलो इंडिया अंतर्गतच्या अनुदानातून संभाजी स्टेडियम,नवीन नाशिक येथे क्रिडांगण विकसित करणे. पेलिकन पार्क येथे (Central Park) विकसित करणेत येत आहे. महापालिकेचे ओपन स्पेस येथे गार्डन विकसित न करता ते मैदानी खेळांकरीता मोकळे ठेवण्यात येणार आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	3.55
सन १९-20 सूधारीत	5.25
सन २०-21 प्रस्तावित	8.00
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

स्मशानभूमींची सुधारणा/नुतनीकरण :

शहरातील स्मशानभुमर्मीची/दफणभुमींची सुधारणा व नुतनीकरणाची कामे हाती घेणेचे नियोजन करण्यात आले आहे.वृक्षतोड थांबविणेसाठी व पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाकांक्षी अशा विद्युत दाहिनींचे दसक,नाशिकरोड व पंचवटी येथील कामांचे नियोजन प्रस्तावित आहे. तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या स्मशानभुमर्मीची /दफणभुमींची सुधारणा व नुतनीकरण करणेत येत आहे. याव्यतिरिक्त स्मशानभुमी परिसरातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,नातेवाईक/नागरिकांसाठी बैठक व्यवस्था इ. सुविधा पुरविणेबाबत विशेष दक्षता घेणेत येत आहे.

CSR अंतर्गतची कामे :

सन १८-19 प्रत्यक्ष	0.59
सन १९-20 सूधारीत	9.88
सन २०-21 प्रस्तावित	

प्रायोजकाकडून वाहतूक बेटे, रस्ता दुभाजके बांधणी व सुशोभिकरण करुन 10 वर्षांसाठी दुरुस्ती व देखभाल करणे. सन २०१६-17 ते 2017-18 मध्ये एकूण 47 कामे करण्यात आलेली असून त्याकामी प्रायोजकाकडून 7.14 कोटी रक्कमेचा खर्च करणेत आलेला आहे. सन 2018-19 ते 2019-20 पावेतो एकूण 56 कामे करण्यात आलेली असून त्याकामी प्रायोजकाकडून 10.47 कोटी रक्कमेचा खर्च करणेत आलेला आहे. विल्होळी नाका, नवीन नाशिक (राष्ट्रीय महामार्ग 3) येथे एच. ए. एल. कंपनी मार्फत 2 लढाऊ विमाने बसविण्यात आलेली आहे. राजीव गांधी मुख्यालयासमोर इर्मजन्सी किऑस्क तसेच महिंद्र कंपनीकडून नाशिक शहरातील 5 मुख्य प्रवेशद्वारांचे सुशोभिकरणाचे काम सुरु आहे. बॉश कंपनीकडून मखमलाबाद गावातील मनपा शाळा क्रमांक 14 व 15 मध्ये मॉडेल स्कुल, सातपूर मायको हॉस्पिटल मध्ये वॅक्सीनेशन रुम व मायको सर्कल या वाहतूक बेटाचे काम सुरु करण्यात येत आहे. करंन्सी नोट प्रेस, नाशिक रोड यांचेमार्फत गावठान मधील झाकीर हुसेन हॉस्पीटल मध्ये इंन्क्युबेशन रुम चे काम सुरु करण्यात येत आहे. नाशिक शहरातील स्वागत कमानींचे सुशोभीकरण, वाहतुक बेट/ रस्ता दुभाजक विकसित करणेचे कामे प्रगतीपथावर आहेत.

सद्यस्थितीत CSR बाहतूक बेट व रस्ता दुभाजकाचे विकसन व देखभालीसाठीच्या कामांकरीता एक्सप्रशेन ऑफ इंटरेस्ट (E.O.I.) अंतर्गत देण्यात येतात. यामध्ये प्रायोजकाकडून रॉयल्टी रक्कम रु. 65.00 लक्ष मनपाकडे जमा करणेत आलेली आहे.

शहर वाहतुक व्यवस्थेसाठी बस डेपोंची निर्मिती :

सन १८-19 प्रत्यक्ष	0.00
सन १९-20 सूधारीत	7.50
सन २०-21 प्रस्तावित	40.00
*भांडवली खर्च	

शहर वाहतुक व्यवस्थेसाठी आडगांव नाका तपोवन येथे व नाशिकरोड सिन्नर फाटा येथे बस डेपोंची निर्मिती व बांधणी करणेचे प्रस्तावित असून निविदाप्रक्रिया पुर्ण झालेली आहे व लवकरच कामे सुरु होणार आहेत.

वाहतुकीचे लेखापरिक्षण :

सुरक्षित वाहतुक व्यवस्थेसाठी रस्ते व चौकांचे वाहतुकीचे लेखापरिक्षण (Traffoc Audit) करुन आवश्यक ते बदल करणे व सुधारणा करणे.

पाणी पुरवठा व्यवस्थापन व यांत्रीकी :

सन १८-19 प्रत्यक्ष	64.50
सन १९-20 सूधारीत	93.69
सन २०-21 प्रस्तावित	120.46
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

नाशिक शहराच्या गरजेपैकी 70 टक्के पाणी गंगापूर धरणातून व 20 टक्के पाणी मुकणे धरणातुन तर 10 टक्के पाणी दारणा नदीवरील चेहडी बंधाऱ्यातुन उचलण्यात येते. सदर पाण्यावर शहरातील सात जलशुध्दीकरण केंद्रांत प्रक्रीया करुन सम्प पंप/एमबीआर मार्फत पाणी ईएसआर मध्ये घेतले जाते.ईएसआर मधून जलवितरण वाहिन्यांव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. सदय:स्थितीत 7 जलशुध्दी करण केंद्रे,7 एमबीआर व 105 ईएसआर/ जीएसआरव्दारे सुमारे 1955.40 कि.मी. जलवितरण वाहिन्यांतून पाणी वितरण करण्यात येत आहे. शहरात प्रतीदिन सुमारे 500 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन मुकणे धरणातुन पाणी पुरवठा करणेसाठी जे.एन.यु.आर.एम योजनेंतर्गत काम पुर्ण करणेत आलेले असुन प्रथम टप्प्यात नाशिक पूर्व,पंचवटी व नविन नाशिक मधील इंदिरानगर, वासननगर, चेतनानगर,दिपालीनगर या ठिकाणी पाणी पुरवठा करणेत येत आहे.

सद्यस्थितीत पाणीपुरवठा प्रणालीतील 'उगम स्त्रोत' (Source), वहन व्यवस्था (गंगापूर धरणापासून जलशुध्दीकरणे केंद्र व एमबीआर पर्यंत पाणी पुरवठयाचे वहन) आणि ' वितरण व्यवस्था' (ईएसआर ते उपभोक्ता नागरिक) या तीनही टप्प्यांमध्ये स्काडा (SCADA) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेला नाही. धरण (Catchment) ते प्रत्यक्ष पाणी वापरणाऱ्या ग्राहकांपर्यतचा (Consumer) पाण्याचा प्रवास व त्याचा हिशोब ठेवणेच्या दृष्टीने,उपरोक्त तीनही भागांमध्येही स्काडा यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. पाणी गळती थांबवून पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी देखील त्याचा उपयोग होणार आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पातील पॅनसिटी योजनेअंतर्गत 'धरण ते नागरीक या संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी स्काडा प्रणाली बसविण्यात येणार आहे. प्राथमिक सर्वेक्षणानुसार शहराचा अनुत्पादक पाणी वापर (Non Revenue Water-NRW) 43 टक्के असून, तो कमी करणे अत्यावश्यक आहे.

सद्यस्थितीत ग्राहक पाणी मिटर मॅकेनिकल बी-टाईपचे असून, ते लवकर नादुरुस्त होतात. तसेच पाणी वापर देयकांत नागरीकांना सरासरी बिल आकारणी होते. पाणी वापरानुसारच देयक आकारणी होण्याच्या दृष्टीने, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरातील सर्व नळ जोडण्यांना AMR सुविधेसह जलमापके बसविण्यात येणार आहेत. SCADA व AMR जलमापकांसाठी स्मार्ट सिटी प्रकल्पात तरतूद करण्यात आली आहे. तसेच जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्ती, नविन वितरीका व जलकुंभासह पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील सुधारणेसाठी **र.रु. 451.29 कोटी** खर्चाचा प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर करण्यात आला आहे**. त्यापैकी र.रु.226.34 कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल अंतिम करण्यात येऊन सदरचा अहवाल मा. शासनाकडे सादर केलेले असुन मान्यतेकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.**

गावठाण भागातील जुन्या जलवाहिन्या , पाणी गळती , असमान पाणीपुरवठा व दुषित पाणी समस्येच्या परिमार्जनासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ग्राहकांना 24 X 7 पाणी पुरवठा करण्याची योजना राबविणेत येत आहे. जुन्या व खराब झालेल्या जलवाहिन्या काढून,नविन जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. विकसित होणाऱ्या भागातील जलकुंभ व वितरण वाहिन्यांची कामे पूर्ण करणे, वितरण वाहिन्या नसलेल्या भागात जलवाहिन्या टाकणे, तसेच जुन्या वितरीका बदलणे या कामांस प्राधान्य देण्यात येत आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	25.99
सन १९-20 सूधारीत	79.75
सन २०-21 प्रस्तावित	135.33
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

मलनि:स्सारण व्यवस्थापन व यांत्रीकी :

केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत गंगापुर येथील 18 द.ल.लि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र आणि 4.5 द.ल.लि. मलउदवहन केंद्र व चिखली नाला येथे 25 द.ल.लि. क्षमतेचे मलउदवहन केंद्र बांधणेचे काम पुर्ण झाले असुन सदरचे मलनि:स्सारण केंद्रे कार्यान्वित करण्यात आले आहे. पिंपळगांव खांब येथे 32 द.ल.लि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र व 55 द.ल.लि.क्षमतेचे मलउदवहन केंद्र बांधणेचे काम प्रगतीपथावर असुन सदरचे काम मार्च 2021 पावेतो पुर्ण करणेचे नियोजन आहे.

तसेच सन 2019-2020 मध्ये मलनि:स्सारण व्यवस्थेसाठी नव्याने विकसित झालेल्या भागांमध्ये 210 कि.मी.च्या मलवाहिका टाकणेची कामे हाती घेतली असुन ती प्रगतीपथावर आहेत. सदर कामांसाठी सन 2019-20 व सन 2020-21 मध्ये आवश्यक तरतुद करणेत आली आहे.

त्याचप्रमाणे अस्तित्वातील **मलनि:स्सारण केंद्रांचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे** नविन मापदंडानुसार सुधारणा व आधुनिकिकरण यासाठी निरी च्या मार्गदर्शनानुसार तांत्रिक सल्लागार यांचेकडुन राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत सादर करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेची कार्यवाही सुरु असुन सदरचा अहवाल राज्य शासनामार्फत केंद्रशासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन निर्देशालय यांचेकडे **र.रु.217.19** कोटीचा सादर करण्यात आलेला आहे.

विद्युत व्यवस्था :

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या रस्त्यांवर अस्तीत्वात असलेल्या पथदीप सुस्थीतीत ठेवणे, पथदीप व्यवस्थेत सुधारणा करणे तसेच ज्या ठिकाणी पथदीपांची व्यवस्था नाही अशा ठिकाणी नविन पथदीप पोल उभारून पथदीपांची व्यवस्था करणे,वाहतूक स्वयंचलीत यंत्रणा बसवीणे, मनपाचे कार्यालये, रूग्णालये, शाळा इमारती इत्यादी ठिकाणी विद्युतीकरण करणे,सीसीटीव्ही बसवीणे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेत येत असुन सदर कामे प्रस्तावित आहेत.

सन १८-19 प्रत्यक्ष	8.40
सन १९-20 सूधारीत	17.31
सन २०-21 प्रस्तावित	27.43
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

मा. महाराष्ट्र शासनाने उर्जा बचतीचे धोरण लागू केल्यामुळे सन 2017-18 व 2018-19 या वर्षात शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे पथदिव्यांमध्ये वीज बचतीच्या पध्दतीच्या अवलंब सुरु असुन त्यानुसार Smart Lighting चा प्रस्ताव मा.महासभा व मा. स्थायी समिती कडुन मजुंर करुन घेणेत आला आहे.

नाशिक महानगरपालिके मार्फत संपुर्ण नाशिक शहरातील अस्तीत्वात असलेले पारंपारीक पथदीप बदलणे, सार्वजनिक खाजगी सहभागातुन (PPP तत्वावर) स्मार्ट स्ट्रीट लाईट बसवीणे व CCMS प्रणाली कार्यान्वीत करणेसाठीचा प्रकल्पाचे कामकाज चालु केले आहे. सदरच्या प्रकल्पामध्ये मनपाची कोणतीही भांडवली गुतवणुक नसुन सदरचे काम जुन 2020 पर्यंत पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे पथदिप सेवेमध्येही सुधारणा होवुन शासनाचा National Lighting Code SP 72 : 2010 प्रमाणे प्रकाशाचा स्तर राहणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष विजेच्या वापरामध्ये व पथदीप देखभाल दुरूस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे. अत्याधुनिक CCMS प्रणाली वापरणेत येणार असल्याने कामकाज पारदर्शकपणे व मानवी हस्तक्षेपाशिवाय पार पाडणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे लाईट चालू व बंद करणेच्या वेळा निर्धारण करणे व नादुरूस्त झालेले पथदिप दुरूस्त करणेबाबत रिअल टाईम माहिती उपलब्ध होऊन नागरीकांना वेळीच दर्जेदार सेवा उपलब्ध होतील.

नाशिक शहराच्या काही भागांमध्ये अजूनही रस्त्यांवर पथदिप नाहीत. तसेच काही ठिकाणी विद्युत खांबांच्या सलगतेमध्ये खंड पडलेला आहे. त्याकरीता आवश्यक ठिकाणी विद्युत पोलची उभारणी करणे व पथदिप व्यवस्था सुधारणा करणे तसेच शहरात 15-20 वर्षापुर्वी बसविलेले गंजलेले/खराब पथदिप व पोल बदलण्याची आवश्यकता आहे.

नाशिक मनपा मार्फत शहरात विविध चौकांमध्ये 47 ठिकाणी स्वयंचलीत ट्रॅफीक सिग्नल कार्यन्वित आहेत. सन 2020-21 मध्ये नाशिक मनपा अर्बन मोबिलीटी सेल च्या सुचनेप्रमाणे सिग्नलची ठिकाणे/चौक प्रस्तावीत करणेत येणार आहे.

ITMS (Intergrated Traffic Management System) शहरातील स्वयंचलीत वाहतुक सिग्नल यंत्रणेचे नाशिक स्मार्ट सिटी कंपनी व शासनाची महा-आयटी कंपनी मार्फत नुतनीकरण करणेचे काम चालु करणेत आलेले आहे.सदरच्या सिग्नलवर CCTV कॅमे-याची व्यवस्था केली जाणार असुन त्याचे नियंत्रण पंचवटी स्मार्ट सिटी कार्यालयातील ICCC मध्ये राहणार आहे.

नाशिक मनपा स्मार्ट सिटी मार्फत RESCO मॉडेल नुसार मनपा कार्यालये, रूग्णालये व इमारतींवर सोलर रूफ टॉप बसविणेचा पथदर्शी प्रकल्प हाती घेणेत आलेला आहे. सद्यस्थीतीत मनपा साधारणपणे र.रू.११ प्रती युनीट प्रमाणे वीज खरेदी करत आहे. सोलर प्रकल्पा अंतर्गत आगामी २५ वर्षांसाठी मनपास र.रू.४.५९ प्रती युनिट प्रमाणे सोलर वीज प्राप्त होणार आहे. अशा प्रकारे मनपाच्या रूफ टॉप बसविणेसाठी मनपाने SECI (केंद्र शासनाच्या गाईड लाईन्स) नुसार पॉवर पर्चेस करारनामा केलेला आहे. मनपाची मुख्यालये,विभागीय कार्यालये व फायर स्टेशन यांचे रूफ टॉप वर सोलर पॅनल बसवुन झालेली आहे.

कार्यशाळा व्यवस्थापन :

सन १८-19 प्रत्यक्ष	5.77
सन १९-20 सूधारीत	7.61
सन २०-21 प्रस्तावित	8.70
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनीक आरोग्य अभियांत्रिकी (पाणी पुरवठा) व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता दोन पाण्याचे टँकर खरेदी करण्याचे प्रस्तावीत आहे. नाशिक मनपाचे सार्वजनीक बांधकाम विभागाकडे एक रोबोटीक एस्कॅव्हेटर व सार्वजनीक आरोग्य अभियांत्रिकी विभाग (मलनि) दोन रिसायकरल मशिन कार्यरत आहेत. सद्यस्थितीत नाशिक शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता नाशिक शहरातील भुयारी गटारींची साफसफाई करणेसाठी 1-हाय प्रेशर हाय सक्शन वॉटर रिसायकलर मशिनचा वापर करणे व नाशिक शहरातील रस्त्यांची साफसफाईसाठी 2-रोडस्विपर मशिन पुरविणे व चालविणे प्रस्तावीत आहे. तसेच नदी काठावरील गाळ काढणेसाठी 1-रोबोटीक एस्कॅव्हेटर मशिन पुरविणे व चालविणे करीता गोदावरी संवर्धन विभागांतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे.

माहिती व तंत्रज्ञान :

ई- गव्हर्नन्स E- Governance -

सन १८-19 प्रत्यक्ष	2.21
सन १९-20 सूधारीत	2.59
सन २०-21 प्रस्तावित	3.65
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

मा.शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणानुसार नाशिक महानगरपालिकेच्या संगणकी-करणाच्या कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा आधिकाधिक वापर करुन दैनंदिन कामकाजात सुसुत्रता, गतीमानता व पारदर्शकता प्रस्थापित करण्याचा मनपा प्रशासनाचा मानस आहे.

१) सार्वजनिक उत्सव/कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणेकरीता ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करणेच्या प्रस्तावित आहे. जेणेकरुन नागरिकांना, संस्थांना त्यांचे मागणीनुसार सार्वजनिक उत्सव/ धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणी तसेच तत्सम परवानगी विनाविलंब संगणकीय कार्यप्रणालीद्वारे उपलब्ध करुन देता येईल.

२) मा. शासन निर्णय परिपत्रक क्रमांक सीओएम २०१२/प्र.क्र.२५/२०१३ संगणक कक्ष, दिनांक ०५/०५/२०१४ अन्वये विभागातील कामकाजात ई- ऑफिस प्रणालीचा वापर करणे, तसेच त्याची अंमलबजावणी करणेबाबत नमुद केले आहे. त्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेत ई-एलएफएमएस प्रणालीची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी सुरु असुन सदर कार्यप्रणालीमध्ये **"दप्तर दिरंगाई प्रतिबंध अधिनियम २००५"** चा अंतर्भाव करण्याचे प्रस्तावित आहे.

३) नाशिक महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणा-या विविध नागरी सेवा, परवानगी व दाखले या नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध् करुन देणेकरीता मनपामार्फत ई-सुविधा केंद्र विकसित करण्यात आले असुन सदरहु ई-सुविधा केंद्र तसेच ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे एकुण ५८ नागरी सेवा पुरविण्यात येत आहेत, मा.शासनाच्या धोरणानुसार सदरहु नागरी सेवा या आपले सरकार पोर्टलवर अधिग्रहीत करण्यात येवुन त्याद्वारे पुरविण्यात येणार आहे.

४) नाशिक महानगरपालिकेच्या कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा आधिकाधिक वापर करणेत येत असुन मनपाच्या सेवा वाहनांचे दैनंदिन महत्वाच्या कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण प्रस्थापित करणेकामी जी.पी.एस यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे.

५) नाशिक महानगरपालिकेमध्ये संगणकीकरणाचे कामकाजांतर्गत जैवीक कचरा संकलन व विल्हेवाट प्रकल्पांतर्गत व्यवस्थापन व शुल्क संकलनाचे कामकाजात सुसुत्रुता व गतीमानता प्रदान करणेकामी जैवीक कचरा शुल्क आकारणी व व्यवस्थापनाकरीता ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असुन सदर कार्यप्रणाली लवकारात लवकर कार्यान्वित करण्यात येणार आहे.

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०/ इमारती-२, मंत्रालय, दिनांक २८/०४/२०१६ मध्ये नमुद केलेनुसार शासकीय कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता निर्माण व्हावी यासाठी केंद्र शासनाच्या "**डिजिटल इंडीया**" अभियानांर्गत मोजमाप पुस्तिका रिअल टाईम पध्दतीने लिहील्या जाव्यात तसेच त्यांचे जतन करणे संगणकाद्वारे शक्य व्हावे यासाठी अत्याधुनिक संगणक प्रणाली ई-मेजरमेंट कार्यप्रणाली व पी.एम.एस प्रणालीचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे.

नाशिक मनपाने एकुण ५८ सेवांचे संगणकीकरण केले असुन एकुण २२ ठिकाणी C.S.R. Activity च्या माध्यमातुन चालविण्यात येत आहे. त्यामुळे मनपाच्या मनुष्यबळामध्ये व खर्चामध्ये ब-याच अंशी बचत झाली आहे. सदर ई-सुविधा केंद्राचा विस्तार वाढविण्यात येणार असुन सदर ई-सुविधा केंद्र हे P.P.P. तत्वावर कार्यान्वित करावयाचे प्रस्तावित आहे. यामध्ये ज्या व्यक्ती किंवा संस्थांची स्वत:ची जागा असेल व ते संगणक व इंटरनेट यांचा खर्च करावयास तयार असतील अशा संस्था किंवा व्यक्तींचा प्रस्ताव तयार करुन त्याप्रस्तावास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवुन संबंधित व्यक्ती किंवा संस्थांकडुन Performance Bank Guarantee/ Security Deposit घेवुन नियमानुसार प्रशासकीय अटीशर्तींच्या अधीन राहुन ई-सुविधा केंद्र P.P.P. तत्वावर चालविण्यास देण्याचे प्रस्तावित आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	1.18
सन १९-20 सूधारीत	1.20
सन २०-21 प्रस्तावित	8.25
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

पर्यावरण व गोदावरी संवर्धन :

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७-अ अन्वये व मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट केंद्र सरकार यांच्या प्राप्त सुचनेनुसार महानगरपालिका यांना पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (इनव्हायरलमेंट स्टेटस रिर्पोट) तयार करणे तसेच भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार अहवाल जनहितार्थ प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

नाशिक मनपा कार्यक्षेत्रातील पर्यावरण स्थितीदर्शक अहवालात हवा प्रदूषण,जल प्रदूषण,टाकाऊ घनपदार्थामुळे होणारे प्रदूषण,ध्वनी प्रदूषण, इ.सर्व बाबींचे वेळोवेळी मापन करुन त्यानुसार अहवाल तयार करण्यात येतो.

नाशिक मनपा क्षेत्रातुन गोदावरी नदीचे पात्र सुमारे 19 कि.मि. लांबीचे व सुमारे 100 फुट रुदीचे प्रवाहीत होते.गोदावरी नदी बारमाही नसल्यामुळे उपलब्ध आवर्तनाच्या आधारे प्राप्त जलसाठा सवंर्धन करुन, त्यातील प्रदुषण टाळण्याच्या दृष्ट्रीने गोदावरी संवर्धन कक्ष स्थापण करण्यात आलेला आहे.गोदावरी नदीपात्रामध्ये नागरीकांकडून कुठल्याही प्रकारचा केरकचरा टाकणे, कपडे धुणे, वाहने धुणे,निर्माल्य टाकणे वा इतर कुठल्याही प्रकारे नदी प्रदुषण केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच होळकर पुल ते टाळकुटेश्वर पुलाच्या दरम्यान स्वच्छते बाबत विशेष लक्ष देण्यात येते.

स्मार्ट सिटी अंतर्गत प्रोजेक्ट गोदा या प्रकल्पामध्ये गोदावरी नदीला येवून मिळणाऱ्या उपनदया मध्ये मिसळणारे मलजल अडविणे व वळविणे प्रस्तावित करण्यात आले आहे, ज्यामुळे नदीपात्राचे होणारे प्रदुषण थांबविले जाणार आहे. तसेच होळकर पुलापासून ते फॉरेस्ट नर्सरी पुलापर्यंत नदीपात्रातील गाळ, माती काढली जाणार आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्राची वहन क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. होळकर पुलापासून ते टाळकुटेश्वरपुलापर्यंत गोदावरी नदीपात्राचे सुशोभीकरण विस्तारीकरण प्रस्तावित करण्यात आलेले आहे, ज्यामध्ये येणाऱ्या भाविक व पर्यटकासाठी विविध सोई सुविधा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत यांत्रिक ट्रॅश स्किमर मशिन कार्यरत करण्यात आले असून त्याद्वारे अधिक परिणामकारक पध्दतीने पानवेलीचे निर्मुलन केले जाईल. गोदावरी प्रमाणेच इतर उपनदयाचे प्रदुषण मुक्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	94.22
सन १९-20 सूधारीत	47.02
सन २०-21 प्रस्तावित	140.00
*भांडवली व महसुली खर्च, आस्थापना व बांधकाम खर्चावर आधारीत उपकर वगळुन	

नगरनियोजन :

विकास आराखडयात आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडांच्या संपादनासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. शासन धोरणानुसार आरक्षण असलेले भूखंड महापालिकेने वेळेवर संपादित न केल्यास, सदर आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

समाजकल्याण :

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध दुर्बल घटकांना उचित सेवा-सुविधा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने,मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी 5 टक्के, महिला/ बाल कल्याणासाठी 5 टक्के ,दिव्यांग कल्याणासाठी 5 टक्के, व क्रीडा धोरणासाठी 5 टक्के, असा एकुण 20 टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

5 % मागासवर्गीय कल्याणकारी योजना:

शासन मार्गदर्शक सुचनांनुसार महापालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती या दुर्बल घटकांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी 5 टक्के निधीची तरतुद करण्यात आलेली आहे.सदर निधीतुन मागासवर्गीय वस्त्यांमध्ये सार्वजनिक रस्त्यांची कामे,पथदीप, पाणीपुरवठा, मल:निस्सारण व्यवस्था, उद्यान विकास व त्यांचे देखभाल दुरस्तीची कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे मागासवर्गीय युवक व युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचे देखील नियोजन करण्यात येते.

सन १८-19 प्रत्यक्ष	9.67
सन १९-20 सूधारीत	33.71
सन २०-21 प्रस्तावित	41.55
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

5 % महिला व बाल कल्याण योजना:

1. घटस्फोटीत/विधवा/परित्यक्त्या महिलां यांचे मुलींच्या विवाहा करीता अर्थसहाय्य योजना
2. विधवा/घटस्फोटीत महिलांची मुले, निराधार मुले यांचेसाठी शिष्यवृत्ती योजना
3. अनाथ/निराश्रित मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनपर अनुदान योजना.
4. अनाथ/निराश्रित मुलांकरीता वार्षिक शैक्षणिक शुल्क अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेच्या अंगणवाडया आदर्श होण्याच्या दृष्टीने अंगणवाडयांचे नुतनीकरण व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहे. अंगणवाडयातील बालकांना पुरक सकस आहार देणेबाबत नियोजन करण्यात आले आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	5.26
सन १९-20 सूधारीत	27.30
सन २०-21 प्रस्तावित	32.70
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

5 % दिव्यांग कल्याणकारी योजना:

महापालिका कार्यक्षेत्रातील अंध/अपंग/मतीमंद/बहुविकलांग/अन्य दिव्यांगांच्या अर्थ सहाय्याकरीता महानगरपालिकेतर्फे कर्णबधीर शस्त्रक्रिया (chochlear implant) अर्थसहाय्य दिव्यांग स्वयंरोजगार अर्थसहाय्य ,प्रौढ बेरोजगार दिव्यांग अर्थसहाय्य,दिव्यांग विद्यार्थी पालक प्रशिक्षण अर्थसहाय्य,दिव्यांग शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षण अर्थसहाय्य, दिव्यांग सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान अर्थसहाय्य, विशिष्ट गरजेच्या दिव्यांगांना अर्थसहाय्य व दिव्यांग क्षेत्रातील संस्था/संघटनांचे सक्षमीकरण,मतिमंद/मेंदुपिडीत तसेच बहुविकलांग दिव्यांगांना अर्थसहाय्य दिव्यांग खेळाडु ज्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे किंवा जे दिव्यांग खेळाडु परदेशात होणाऱ्या विविध क्रिडा स्पर्धांकरीता सहभाग नोंदवु इच्छिता अशा दिव्यांगा करीता अर्थसहाय्य/शिष्यवृत्ती योजना अशा दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजने अंतर्गत 470 लाभार्थी यांना अर्थसहाय्य करण्यात आलेले आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	1.61
सन १९-20 सूधारीत	9.35
सन २०-21 प्रस्तावित	27.63
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

5 % क्रीडा विषयक धोरण:

क्रीडा विषयक योजनांसाठी 5 टक्के निधीची तरतुद करणेत आलेली आहे. शासनाच्या "खेलो इंडीया" संकल्पनेतुन महापालिका क्षेत्रातील मुला-मुलींना मैदानी खेळांकडे प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने सर्व सहा विभागांमध्ये मोठी क्रिडांगणे विकसित करण्याचे नियोजन करणेत आले आहे.तसेच राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडुंना क्रीडा शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	10.30
सन १९-20 सूधारीत	28.00
सन २०-21 प्रस्तावित	32.40
*भांडवली व महसुली खर्च आस्थापना वगळून	

सन १८-19 प्रत्यक्ष	0.00
सन १९-20 सूधारीत	0.20
सन २०-21 प्रस्तावित	0.55
*महसुली खर्च, आस्थापना वगळून	

युवा व ज्येष्ठ नागरिक धोरण :

विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या युवकांसाठी प्रोत्साहनपर युवा धोरण राबविण्यात येईल. त्याअंतर्गत अंदाजपंत्रकात इन्क्युबेशन सेंटर,प्रसिध्दी व प्रचार कार्यक्रमांसाठी तरतुद करण्यात आलेली आहे.

वैद्यकीय सुविधा व आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढते मानवी आर्युमान लक्षात घेता समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत वाढ होत आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या वृध्दापकाळातील अडचणी दुर करुन वृध्दांचे जगणे सुसहय करणेच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीक धोरण अवलंबविणेत येत आहे. ज्येष्ठ नागरिकांचे विरंगुळा केंद्र, आरोग्य विंषयक/करमणुकींचे कार्यक्रम व चर्चासत्रांच्या आयेाजन यांकरीता रु.25.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे.

शिक्षण विभाग

सन १८-19 प्रत्यक्ष	52.65
सन १९-20 सूधारीत	59.89
सन २०-21 प्रस्तावित	97.37
*प्राथमिक व माध्यमीक शिक्षण भांडवली, महसुली व आस्थापना खर्चासहीत	

नाशिक महानगरपालिकेतील ९० शाळांमध्ये सन २०19-20 शैक्षणिक वर्षामध्ये प्राथमिक माध्यमिक शाळेतील एकूण ३१२३१ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच त्यांचा सर्वांगीण विकासाचे ध्येय डोळयासमोर ठेवण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मूलभूत सुविधा उपलब्ध करून देवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी नाशिक महानगरपालिका सर्वत्र प्रयत्न करत आहेत.

महानगरपालिका शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन व डिस्पोजल मशिनसाठी सन 2020-2021 च्या अंदाजपत्रकात रु.40 लक्ष् तरतुद करण्यात आली आहे. सर्व मनपा शाळांमध्ये प्रत्येकी एक सॅनिटरी नॅपकिन मशिन व एक डिस्पोजल मशिन बसविण्यात येईल.

सर्व शिक्षा अभियांनांतर्गत मागासवर्गीय संवर्गातील विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्यात येतात.तथापी खुल्या संवर्गातील गरीब विदयार्थी सदर लाभापासुन वचित राहू नये म्हणून त्यांना प्रत्येकी दोन गणवेशांसाठी अनुदान देण्याची तरतुद सन 2020-2021 च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. तसेच महापालिका शाळा मधील विद्यार्थ्याच्या बुट व मोज्यांसाठी तरतुद करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे. दुषित पाण्यापासुन होणारे आजार टाळण्यासाठी विद्यार्थ्याना शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्ट्रीने सर्व मनपा शाळांमध्ये वॉटर प्युरीफायर बसविण्यासाठी,तसेच मनपा शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.जेतवन नगर येथील शाळांमध्ये 50 विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. सदर वस्तीगृहातील विद्यार्थी अत्यंत गरीब/अनाथ असल्याने त्यांना मुलभुत सोईसुविधा देणेकामी पुरेशी तरतुद करण्यात आली आहे.

अद्यावत मनपा इमारत निर्मिती तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिंक विचार करण्याच्या दृष्ट्रीने मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरीक विकासासाठी खेळणी सर्व शाळांमध्ये क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.कार्यालयीन खर्च व क्रिकेट, बॅडमिंटन, फुटबॉल, व्हॉलीबॉल या खेळांचे साहित्य पुरविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक स्वच्छता,घनकचरा व्यवस्थापन व यांत्रीकी :

सन १८-19 प्रत्यक्ष	51.78
सन १९-20 सूधारीत	53.83
सन २०-21 प्रस्तावित	97.17
*भांडवली व महसुली खर्च,आस्थापना खर्च वगळुन	

महापालिकेच्या 1863 सफाई कर्मचा-यांमार्फत शहरातील रस्ते,मोकळी मैदाने, सार्वजनिक ठिकाणे,भाजी मार्केटस यांची दैनंदिन स्वच्छता करणेत येते.तसेच रामकुंड,

गोदाघाट येथे स्वतंत्र स्वच्छता निरीक्षक नेमून, गोदावरी नदीपात्राची स्वच्छता राखणेची दक्षता घेणेत येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक कार्यक्रम,धार्मिक सणांच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता मोहिम राबविणेत येते. दैनंदिन 550-600 टन संकलीत केलेला कचरा बाहययंत्रणेव्दारे 259 घंटागाडीच्या सहाय्याने पालिकेच्या खत प्रकल्पावर रवाना केला जातो. पाथर्डी शिवार येथील खत प्रकल्पावर संपूर्ण शहरातील वर्गीकृत घनकचऱ्यावर कल्चर,सॅनिटायझर फवारुन,दुर्गंधी कमी करुन व 30 दिवस प्रक्रिया करुन त्यापासून कंपोस्ट खत तयार केले जाते.

घनकचऱ्यातील अविघटनशील भागापासून आरडीएफ व प्लास्टीकपासून एलडीओ ऑईल तयार केले जाते. तसेच खत तयार झाल्यानंतर अविघटनशील (इनर्ट) कचरा लँडफिलवर टाकला जातो. सदर प्रकल्पातील चार लँडफिलपैकी (A,B,C,D) दोन लँडफिल (C व D) शास्त्रोक्त पध्दतीने रिमेडिएशन करुन, A व B लँडफिलवर टाकण्यात आले आहेत. तसेच शास्त्रोक्त लॅडफिल (S.L.F.) तयार करण्यात आली आहे. सदर लँडफिलवर विविध थर टाकून, त्यावर हिरवळ लावणेत येत आहे .

केंद्र व जर्मन शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून घनकचऱ्यापासून विजनिर्मितीचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प मनपाने कार्यान्वीत केलेला आहे. सदर प्रकल्पात दररोज सुमारे 15-20 मेट्रीक टन ओला कचरा (हॉटेल वेस्ट) व 10-15 किलोलिटर सार्वजनिक शौचालयातील मलजलावर प्रक्रीया करुन, मिथेन गॅसव्दारे दररोज सरासरी 700 युनिट विजनिर्मिती करणेत येत आहे. तसेच कंस्ट्रक्शन व डिमॉलीशन कच-यावर प्रक्रिया करणेच्या दृष्टीने, शहरातील कंस्ट्रक्शन व डिमॉलीशन वेस्ट संकलन, वाहतूक व प्रक्रिया करुन, त्यापासून विविध उप-उत्पादने तयार करण्यासाठी 100 मे.टन प्रतीदिन क्षमतेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर प्रस्तावीत करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची योग्य देखभाल,निगा व दुरूस्ती करुन त्यांच्या व्यवस्थापनासाठी शहरातील 5941 सिट्स उपलब्ध आहेत.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर नागरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविणेच्या अनुषंगाने, शहरातील नागरीकांना शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणेत येत आहे. तसेच पर्यावरण व आरोग्यविषयक समस्या टाळणेसाठी "घर तेथे शौचालय' योजनेंतर्गत शौचालय नसलेल्या कुटुंबास अर्थसहाय्य देण्यात येत आहे. सर्वेक्षणानुसार पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना शौचालय बांधणेकामी, प्रथम हप्त्यापोटी प्रत्येकी रू.6,000 व शौचालय बांधकामानंतर उर्वरित रू.6,000 असे,रू.12,000 अनुदान देणेत येत आहे. नाशिक मनपा क्षेत्रातील 7,841 कुटुंबांचे वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण झाले असून, शहरास ODF++ घोषित करणेत आले आहे.

मोफत अंत्यसंस्कार योजनेंतर्गत अमरधाम येथे हिंदू धर्मीयांच्या मृतदेहांचे दहन,तसेच लिंगायत,गोसावी,नाथपंथी व गवळी समाजातील मृतदेहांच्या

दफनविधीसाठी मोफत साहित्य पुरविणेत येते.त्याचप्रमाणे अंत्यसंस्कारासाठी डिझेल शवदाहिनी,नाशिक पूर्व विभागातील अमरधाम येथे विद्युत दाहिनी सुरू करणेत आली आहे.मुस्लिम व ख्रिश्चन धर्मीय मृतदेहांच्या दफनविधीसाठी देखील मोफत साहित्य पुरविणेत येते.

पर्यावरणाचा समतोल राहणाच्या दृष्टीने भविष्यात मोक्षकाष्ट/डिझेल दाहिनी/विद्युत दाहिनी यासारख्या पर्यावरणपुरक अंत्यविधीचा पर्याय स्विकारल्यास त्यांनाच केवळ "मोफत अंत्यसंस्कार योजना" चालु ठेवणे विचारधीन आहे तसेच मनपाव्दारे उद्यानातील पालापाचोळा, वृक्षछाटणी कचऱ्यापासून तयार करणेत आलेल्या इंधन विटाचा अंत्यविधीकरीता वापर करणेचे प्रयोजन आहे.

सार्वजनिक आरोग्य :

सन १८-19 प्रत्यक्ष	16.38
सन १९-20 सूधारीत	21.45
सन २०-21 प्रस्तावित	51.87
*भांडवली व महसुली खर्च,आस्थापना खर्च वगळुन	

महानगरपालिका कार्यक्षेत्रात 4 सार्वजनिक रुग्णालये व 30 शहर प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत.सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आरोग्यसेवा, शस्त्रक्रिया, गर्भवती माता व नवजात शिशुसेवा पुरविल्या जातात. तसेच आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक सुविधा देण्यात येतात. शहर प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत बाहयरुग्ण तपासणी व उपचार,तसेच कुटुंब कल्याण, लसीकरण, किटकजन्य आजार, क्षयरोग,कुष्ठरोग,माता व बालसंगोपन कार्यक्रम
इ.राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात.

डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात बाहययंत्रणेव्दारे 321 विविध चाचण्या CGHS दरात उपलब्ध करणेत येत आहेत. Preventive health checkup प्रस्तावित करणेत आले आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक प्रभागातील सामान्य नागरीकांना प्रबोधन करणेकामी पथनाटयाव्दारे संसार्गिक व असंसार्गिक आजाराबद्यल माहिती होणार आहे. त्याचप्रमाणे सीएसआरच्या माध्यमातुन झोपडपट्टयांमध्ये फिरत्या दवाखान्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नवीन जे.डी.सी.बिटको रुग्णालयात एमआरआय,सीटी स्कॅन मशिन बसविण्याचे काम सुरु आहे. डिजीटल एक्स-रे सुविधा अद्ययावत प्रयोगशाळा कार्यान्वित झाली आहे. सातपुर येथे नविन रुग्णालयाचे काम पुर्ण होत आहे.त्याप्रमाणे झोपडपट्टी परिसरात 10 मोहल्ला क्लिनीक सुरु करणेचे प्रस्तावित असुन, सेवानिवृत्त वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मदतीने रुग्णांची तपासणी करुन जेनेरिक औषधे देण्याचे नियोजन आहे.

महापालिका रुग्णालयांमध्ये मानधनावर 25 वैद्यकिय अधिकारी कार्यरत असुन, 23 वैद्यकिय अधिकारी व 5 फिजीशियन यांची नियुक्ती प्रक्रिया कार्यान्वीत आहेत. त्याचप्रमाणे रुग्णालयातील आवश्यक उपकरणे,साहित्य खरेदी प्रस्तावित आहे. नविन चार सोनोग्राफी मशिन व दोन डोळयांचे शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे मायक्रोस्कोप अल्पावधीतच रुग्णालयात दाखल होत आहे.

मनपा रुग्णालयात व श.प्र.आ.केंद्र येथे असंसर्गजन्य आजार जसे की डायबीटिस, रक्तदाब,दमा,हृदयासंबधी आजार याचे रुग्ण अत्यंत तुरळक प्रमाणात आहे व खाजगी रुग्णालयात जास्त प्रमाणात भरती केले जातात त्यामुळे आरोग्य

विभागाने नागरिकांमध्ये जाऊन सर्वसाधारण आरोग्य तपासणी व संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार विषयी जनजागृती कार्यक्रम राबविणे कामी तरतुद केली आहे.

शासनाकडुन एनयुएचएम,आरएनटीसीपी व हिवताप निर्मूलन कार्यक्रमांतर्गत स्वतंत्र अनुदान प्राप्त होणार आहे. ऑन लाईन जन्म दाखले देणे सुरळीत चालु आहे. ऑन लाईन मृत्यु दाखले देणे प्रायोगिक तत्वावर सुरु आहे. नाशिक नगरीत कुष्ठरोग्यांना दरमहा र.रु.1500/- इतके अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा केले जाते त्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे.

पशुवैद्यकीय सेवा :

सन १८-19 प्रत्यक्ष	0.91
सन १९-20 सूधारीत	1.31
सन २०-21 प्रस्तावित	6.40
*भांडवली व महसुली खर्च,आस्थापना खर्च वगळुन	

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका हद्दीतील मोकाट व भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व अँटीरेबीज लसीकरण कार्यक्रम राबविणेत येत आहे. महापालिकेच्या कत्तलखान्यात येणा-या जनावरांच्या नोंदी, कत्तल फी वसूली,साफसफाई,महात्मा फुले मार्केट/भद्रकाली कत्तलखान्यांच्या इटीपी प्लॅन्टची (Effluent Treatment Plant) दैनंदिन देखभाल करणेत येते. महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांची विल्हेवाट खतप्रकल्पातील इनसिनरेटर येथे करणेत येते. अनाधिकृत मांस विक्री करणा-या व्यावसायिकांवर दंड, मांसजप्ती अशी कारवाई करणेत येते. मोडकळीस आलेले कत्तलखाने नव्याने तयार करणेबाबीच्या कामाकरीता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे. तसेच नाशिकरोड व नवीन नाशिक पाथर्डी शिवारात नवीन कत्तलखाने बांधणे प्रस्तावित केलेले आहे.

उद्यान विकास :

सन १८-19 प्रत्यक्ष	9.89
सन १९-20 सूधारीत	21.33
सन २०-21 प्रस्तावित	24.23
*भांडवली व महसुली खर्च,आस्थापना खर्च वगळुन	

नाशिक शहरातील मध्यवर्ती ठिकाणी जुन्या काळातील जॅक्शन गार्डन व स्वांतत्र्योत्तर काळातील शिवाजी उद्यानाचे नुतनीकरणास अमृत योजनेत केंद्र सरकारने र.रु.1.07 कोटी व राज्यशासनाने र.रु.53.50 लाखाचे अनुदान मंजुर केले आहे. सदरच्या सुमारे र.रु.5.00 कोटीच्या स्मार्ट उद्यानात ब्रिटीश कालीन व शिवकालिन प्रकारच्या वैशिष्टयपुर्ण उद्यानाचा संगम असलेले आकर्षक पर्यटनकेंद्र नाशिककरांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असुन काम हे सन 2020-21 मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन करणेत आले आहे.

नविन नाशिकमध्ये 17 एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे भारतातील पहिले orchadium प्रकारचे मध्यवर्ती उद्यान त्यात सुमारे 25 मीटर उंचीचे व्हर्टिकल उद्यान असलेले वैशिष्टयपुर्ण 5 टॉवर रेनवॉटर हावेस्टिंग सोलर व्यवस्था व 18 मीटर उंचीवर त्यांना जोडणारा प्लॅट फॉर्म, आधुनिक पध्दतीने विकसित उद्यान,मोठमोठया खेळणी, साहसी प्रकारचे सायकल ट्रॅक, जॉगींग ट्रॅक,मध्यवर्ती कारंजे,फुडहब,कार्यक्रमांसाठी लॉन व उद्यानात येण्यासाठी संपुर्ण शहराची कनेक्टीव्हीटी असलेली बससेवेची सुविधा असा एकुण र.रु.34.00 कोटीचा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. पैकी र.रु.17.00 कोटीच्या कामाची निविदा काढुन कामास सुरुवात करण्यात आली आहे. त्यात विशेष निधीअंतर्गत र.रु.9.50 कोटी निधी शासनाकडुन प्राप्त झाला आहे. व पर्यटना अंतर्गत र.रु.5.00 कोटी निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. त्यानुसार काम हे

प्रगतीपथावर असुन या आर्थिक वर्षात पुर्ण केले जाणार आहे. या आर्थिक वर्षात उर्वरीत कामासाठी तरतुद करण्यात आली आहे.

पंचवटीत कालिकानगरमध्ये 7 एकरवर जॉगींग ट्रॅक व ज्येष्ठांसाठी सुविधा असलेल्या गार्डनचे काम पुर्ण करण्यात येत आहे. नाशिकरोड रेल्वे स्टेशनजवळ सिन्नरफाटा,येथे नवीन उद्यान,जुन्या नाशिकमध्ये आग्रारोड जवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे नुतनीकरण, राका कॉलनीत कस्तुरबानगर उद्यान तयार करणेचे काम पुर्ण करण्यात आले आहे. नाशिक पुर्व विभागात भाभानगरमध्ये कानडे उद्यानाचे नुतनीकरण, सातपुरला हौसिंग कॉलनीजवळ यात्रेकरु व पर्यटकासाठी उद्यान या सारखी कामे शहराच्या सामाजिक आरोग्यासाठी मनोरंजनासाठी व पर्यटनासाठी विकासासाठी हाती घेण्यात आली असुन ही कामे प्रगतीपथावर आहे.

शहरात गेल्या 10 वर्षापासून खंडित झालेला पुष्पमहोत्सव सलग दुसऱ्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना विविध प्रकारची फळे, फुले व दुर्मिळ प्रजातीची वृक्ष पहावयास मिळणार आहे. तसेच या वर्षी बेल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरात 50 कोटी वृक्ष लागवड अंतर्गत सुमारे 50,000 हजार वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविणेत येत आहे व त्यातुन गोदावरी,नंदिनी, वालदेवी,दारणा या सर्व नदयांचे पुर्नजीवन करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. सर्व नाशिककरांच्या सहभागाने प्रत्येक विभागात "शहरी देवराई" निर्माण करुन इमारतींच्या विकासासोबत आवश्यक असलेले "ऑक्सीजन पार्क" विकसित करण्यात येत आहे. ही सर्व कामे सन 2020-21 मध्ये पुर्ण करण्याचे दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

या वर्षात अमृत योजने अंतर्गत चुचांळे येथील आरक्षित जागेत वन उद्यान विकसित करणेचे काम हाती घेण्यात येत आहे. तसेच शहरातील दादासाहेब फाळके स्मारक, वसंत कानेटकर उद्यान, गोदावरी परिचय उद्यान, सोमाणी उद्यान नुतनीकरणासह विकसित करणेचे काम हाती घेण्यात येत आहे. तसेच नाशिक शहरातील सहाही विभागातील अस्तित्वातील उद्यानाचे ठिकाणी नुतनीकरणा अंतर्गत लॉन लावणे,शोभिवंत वृक्षाची लागवड,पुष्पवाफे,पाथवे व इतर आवश्यक कामे करणेचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. ही सर्व कामे हाती घेऊन याच आर्थिक वर्षात पुर्ण करणेत येणार आहे.

अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन :

सन १८-19 प्रत्यक्ष	0.11
सन १९-20 सूधारीत	0.05
सन २०-21 प्रस्तावित	0.55
*भांडवली व महसुली खर्च,आस्थापना खर्च वगळुन	

महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षावर दरवर्षी पावसाळयामध्ये मोठी जबाबदारी असते. वेगवेगळया आपत्ती उदा.पुर,भुकंप,घर पडणे, झाडे पडणे, रासायनिक दुर्घटना इ.प्रसंगी प्रथमत: प्राथमिक सहायता करणेसाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभाग सुसज्ज करणे अत्यंत गरजेचे आहे.त्यासाठी शासनाच्या आपत्कालीन विभाग तसेच एन.डी.एम.ए.कडून येणा-या निर्देशानुसार आपत्कालीन व्यवस्थापन चालविले जाते.

सन 2020-21 हया वर्षात आपत्कालीन व्यवस्थापन कक्षातर्फे महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये,प्रत्येक प्रभागामध्ये जनजागृती व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

आयोजित करुन नागरिकांना/स्वयंसेवकांना जास्तीत जास्त संख्येने प्रशिक्षीत करण्याचा मानस आहे. तसेच सराव वर्ग आयोजित करुन त्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येईल.

अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत 6 अग्निशमन केंद्रे असुन, प्रत्येक विभागामध्ये एक याप्रमाणे प्रस्थापीत केलेले आहे. नाशिक महानगरपालिका परिक्षेत्रात औद्योगिक वसाहती मोठया झपाटयाने वाढत असल्याने अग्निशमन विभागाला वेळीच मदत पुरवावी लागत असते. अग्निशमन दलाकडे वॉटर टेंडर, फायर टेंडर, मेगा बाऊजर, फ्लड रेस्क्यु व्हॅन, हॅजमॅट व्हॅन, हैड्रोलीक प्लॅटफार्म (32 मीटर),बी.ए.सेट व्हॅन,अतिशिग्र प्रतिसाद व्हॅन (क्यु.आर.व्ही.) उपलब्ध आहेत. नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये 35 मीटर पेक्षा उंच इमारतींना नगरनियोजन विभागाकडून इमारतीच्या बांधकामांना परवानगी दिली जात असल्याने उंच इमारतींच्या आगी पासुन व बचावाच्या संरक्षणासाठी विदेशी बनावटीची टर्न टेबल लॅडर 68 मीटर (टी.टी.एल.वाहन) उंचीची आपत्कालीन परिस्थीतीवर मात करण्यासाठी पुढील वर्षी खरेदी करण्याचा मानस आहे. शासन निर्देशाप्रमाणे शहरामधील हॉस्पीटल, हॉटेल, रहिवाशी उंच इमारती, मॉल, सिनेमागृह, स्कुल, कॉलेज, शासकीय इमारती, मंगल कार्यालये, पेट्रोल पंप, गॅस गोडावून, नाटयगृह इ. मध्ये अग्निसुरक्षा उपाययोजना बसविणे, त्यानुसार अग्निशमन विभागाकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाय योजना अधिनियम 2006 अन्वये आगसुरक्षा निधी भरुन घेवून ना हरकत दाखला देणे बंधनकारक करणे गरजेचे आहे.

अतिक्रमण निर्मूलन :

महानगरपालिका क्षेत्रामध्ये खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामे व सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणांचे निष्कासन करण्यासाठी 6 विभागीय कार्यालयां मध्ये प्रत्येकी एक व मुख्यालयात एक अशी एकुण 8 पथके तयार करण्यात आलेली आहे. सदर पथकांकरीता 8 वाहने व 55 कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आलेली आहेत. खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामे काढणेसाठी नियमबाहय बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन अंतीम नोटीस दिल्यावर अनधिकृत बांधकामांची कार्यवाही केली जाते. सार्वजनिक रस्ते व खुल्या जागांवरील अतिक्रमण कारवाई अंतर्गत हातगाडया, टपऱ्या, स्टॉल, होर्डींग व बॅनर इ. साहीत्य जप्त करण्यात येते तसेच जप्त केलेले साहीत्य सोडविण्यासाठी दंड वसुल करण्यात येतो.

सन १८-19 प्रत्यक्ष	1.20
सन १९-20 सूधारीत	2.52
सन २०-21 प्रस्तावित	2.62
*महसुली खर्च, आस्थापना खर्च वगळुन	

महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डींग नियंत्रणासाठी प्रत्येक विभागीय कार्यालय निहाय सिटीझन कमिटीची स्थापना करण्यात येऊन नागरीकांना तक्रारी कळविण्याकरीता टोल फ्री क्रमांक व SMS क्रमांकाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच अनधिकृत होर्डींग लावणाऱ्यांविरुध्द अतिक्रमण विभागामार्फत संबंधीत पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात येत असतात. त्याचप्रमाणे अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत करावयाच्या महानगरपालिका स्तरीय समिती स्थापन करण्यात येऊन,मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार अनधिकृत धार्मिक स्थळे हटविण्याची

कारवाई करण्यात येत आहे.या व्यतिरिक्त सार्वजनिक रस्त्यांवर रहदारीस अडथळा होईल अशाप्रकारे फेरीवाले/ हॉकर्स यांनी व्यवसाय केल्यास अतिक्रमण निमुर्लन मोहिमेत त्यांचेवर कारवाई करण्यात येत आहे.

प्रकल्प :

शहराच्या विकासाचे नियोजन करण्याच्या दृष्ट्रीने झोपडपट्टी मुक्त शहराचा विकास साधण्यासाठी घरकुल योजनांच्या माध्यमातून झोपडपट्टीवासीयांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा हेतू साधण्याचा प्रयत्न करीत आहे.

रमाई आवास योजने अंतर्गत रमाई महानगरपालिका शेत्रातील दारिद्र रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध यांना लाभ देण्यात येणार आहे. स्वताच्या मालकीचे झोपडी/कच्चे घरे अथवा मोकळे जागा असणाऱ्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दुरुस्तीसाठी रु. २.५० लाखापर्यंत अनुदान देण्यात येत आहे.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा पुरविणे (बी.एस.यु.पी.) पुरविण्याच्या योजनेत पात्र झोपडी धारकास 269 स्के.फुट स्क्के.फुटाची सदनिका दिली जात आहे. शहरातील शिवाजीवाडी, वडाळा,चुंचाळे,साम्राटनगर,शिवनगर,भीमवाडी व संजय नगर-मजुरवाडी,निलगीरीबाग, गीताई नगर,नागरे नगर,चेहेडी सामनगाव,गांधीधाम या ठिकाणांवर एकूण ७४६० घरकुले बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेत आजपावेतो पूर्ण झालेल्या एकूण ७२०७ घरकुलांची सोडत काढण्यात आलेली आहे.

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत सर्वासाठी घरे 2022 या संकल्पनेनुसार झोपडपटयांचा "आहे तेथेच" पुनर्विकास करण्यात येत आहे. तसेच कर्ज सलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येत आहे. खाजगी भागीदारीतुन सदर घरांची निर्मिती करुन, वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान देण्यात येत आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांचे सर्वेक्षणानुसार एकूण १५९ झोपडपट्टी क्षेत्रांमध्ये 55520 कुटुंबातील १९२९५९ लोकसंख्येच्या 41407 झोपडपटया आढळून आलेल्या आहेत.

महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) संबंधी नियमावली समाविष्ट करण्यासाठी,नगररचना विभागाद्वारे शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.सदर नियमावलीच्या मंजुरीनंतर त्यातील तरतुदींच्या आधारे घटक क्र.1 जमिनीचा साधनसंपत्ती (संसाधन) म्हणुन वापर करून त्यावरील झोपडपटयांचा “आहे तेथेच” पुर्नविकास करणे या घटकाबाबत कार्यवाही करण्यात येर्इल.

घटक क्रमांक २,३ व ४ अंतर्गत मागणी सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार एकूण ५३२७१ अर्ज प्राप्त आहे.शासन मार्गदर्शनानुसार घटक निहाय कार्यवाही करण्यात येत आहे.

घटक क्रमांक ४ आर्थिक दृष्टया दुर्बल (EWS) घटकातील लाभार्थीद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान अंतर्गत २ विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) केंद्र स्तरावर मंजुर झालेले असून त्यातील एकूण लाभार्थ्यांची संख्या ४०१

इतकी आहे. संबंधित लाभार्थ्यांना ईमारत बांधकाम परवानगी सादर करणेबाबत कळविण्यात आलेले असून, बांधकाम परवानगी सादर केले नंतर अनुदान वाटप कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे व त्या अनुषंगाने १८ लाभार्थ्यांना प्रथम टप्प्याचे अनुदान वितरीत करण्यात आलेली आहे.

मा.शासनाचे मार्गदर्शनानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत मागणी सर्वेक्षण व झोपडपट्टी सर्वेक्षण च्या आधारे "सर्वांसाठी घरे कृती आराखडा" (Housing For All Plan of Action-HFAPoA) मा.शासनाला सादर करण्यात आलेला आहे. तसेच जुन्या गावठाणचा विकास करण्याच्या दृष्ट्रीने क्लस्टर डेव्हलपमेंटद्वारे सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय फेरीवाला धोरण :-

महानगरपालिका क्षेत्रातील 9620 फेरीवालांची बायोमेट्रिक पध्दतीने नोंदणी करणेत आलेली आहे. या नोंदणीकृत फेरीवालांना नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र दिली जाणार आहेत. फेरीवालांकडुन दैनंदिन जागा लायसन्स फी वसुलीसाठी ऑनलाईन पध्दती अवलंबविण्यास येणार आहे. फेरीवालांना जागा नेमुण देण्यासाठी महापालिकेच्या सहाही विभागात फेरीवाला क्षेत्र निर्माण करणेत आले आहे. फेरीवाला क्षेत्र निश्चित झाल्यानंतर फेरीवालांना जागा निश्चित करुन देण्यासाठी आखणी करावी लागणार आहे. तसेच फेरीवाला क्षेत्रात पाणी,स्वच्छता गृह, विदयुत इ.सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

मिळकती, जाहिरात व परवाने :-

महापालिका मिळकतीचे सर्वेक्षण करुन सर्व मिळकतींच्या अद्यावत माहितीचे संगणकीकरण करण्यात आले आहे. तसेच नव्याने निर्माण होणाऱ्या मिळकतींची संगणकीय नोंद घेण्यात येत आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीन्वये,बाजार मुल्यापेक्षा कमी भाडेपटयाच्या अथवा करारनामा संपलेल्या मिळकतीसाठी नवीन करारनामा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. व्यावसायिकांना परवाने देण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्यासाठी, संगणकीय ऑनलाईन परवाना सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

चित्रपट महर्षि दादासाहेब फाळके स्मारक व दादासाहेब गायकवाड सभागृह यांचे नुतनीकरण करण्यात येत आहे. तसेच बाहय यंत्रणेद्वारे जलतरण तलावांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे विचाराधीन आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	2.86
सन १९-20 सूधारीत	3.94
सन २०-21 प्रस्तावित	10.32
*भांडवली व महसुली खर्च, आस्थापना खर्च वगळुन	

परिवहन सेवा :

नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सक्षम व शाश्वत शहर बससेवा सुरु करणेकरीता, सदर कामी स्वतंत्र कंपनी स्थापन करणेस मान्यता देण्यात आलेली असुन त्यानुसार "नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि." नावाची कंपनी स्थापन करणेत आलेली आहे.. त्याद्दष्टीने जीसीसी तत्वावर ऑपरेटर नेमणे,नवीन डेपो, टर्मिनल,बसथांबे व अन्य पायाभूत सुविधा उभारणेकरीता विविध पातळीवर कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

सन १८-19 प्रत्यक्ष	0.00
सन १९-20 सूधारीत	22.50
सन २०-21 प्रस्तावित	70.00
*भांडवली व महसुली खर्च	

शहर बससेवेकरीता सीएनजी, इलेक्ट्रीक व डिझेल या प्रकारच्या सुमारे 400 बसेस वर्षभराच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. प्रथम टप्प्यातील बसेसचा पुरवठा होऊन, सन 2020-21 या वर्षाच्या पुर्वार्धात बससेवा कार्यान्वीत होणे अपेक्षित आहे. शहर बससेवेसाठी माहिती व तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणेत येईल. त्याकरीता बस संचलनासाठी बसेसमध्ये इटेलिजंन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टीम अंतर्गत येणारे कॅमेरे, जी.पी.एस.यंत्रणा,पॅसेंजर अनांऊंसिंग सिस्टीम,डिजीटल रुफ बोर्ड तसेच बस थांब्यांसाठी दिलेले विविध टर्मिनल व बसथांबे वरील डिजीटल मार्ग फलक व डिजीटल सुचना फलक, मुख्य नियंत्रण कक्ष तसेच प्रवाशांसाठी वेळापत्रक व जी.पी.एस. व्दारे बसेसचे लोकेशन व भाडे आकारणी, स्मार्ट कार्ड देण्याच्या सुविधेसाठी लागणरे मशिन्स इत्यादीसाठी निविदा काढणेत आली आहे.

नागरीकांना बससेवेचे वेळापत्रक,मार्ग व अन्य माहिती मोबाईल ॲप्लीकेशनवर उपलब्ध होईल वेळापत्रक बदलाबाबत पूर्वसूचना (Alarm),तक्रार निवारण सुविधा (Grievance) व अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. नागरीकांना शाश्वत सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध झाल्याने, शहरातील रस्त्यांवरुन खाजगी वाहनांची संख्या कमी होईल. पर्यायाने शहराच्या वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी होऊन, ध्वनी व वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

कर्मचारी कल्याण :

शासन निर्णय व मा.महासभा ठरावान्वये महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना गृह कर्ज व वाहन कर्जाच्या मर्यादेत वाढ करण्यात आलेली आहे. त्यानुसार घर/वाहन कर्जासाठी सन 2020-2021 च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच राज्य शासनाने सातवा वेतन आयोग लागु करण्यास मंजूरी मिळताच,मनपा कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यात येईल. त्यासाठी अंदाजपत्रकात कर्मचारी वेतनासाठी रु.407.63 कोटी व निवृत्ती वेतनासाठी रु.110.00 कोटी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मनपा अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षणासाठी रु.1.00 कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांना दिर्घ आजारावर उपचारासाठी कर्मचारी कल्याण निधीतुन आर्थिक मदत दिली जाते. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांचे कुटुंबातील व्यक्ती पती,पत्नी,आई वडील वय वर्ष 25 पावेतोचे पाल्य यांच्यासाठी दिर्घ आजाराच्या उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते. तसेच दोन पाल्यांकरीता उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जाते. अधिकारी व कर्मचारी हे सेवेत असतांना मयत झाल्यास त्यांचे वारसांना आर्थिक मदत दिली जाते. कामाचे कर्तव्य बजावत असतांना (ऑन डयुटी) महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी हे मयत झाल्यास त्यांचे वारसांना आर्थिक मदत दिली जाते. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास त्यांचा यथोचित सत्कार सोहळा करुन त्यांना आर्थिक मदत दिली जाते.

समूह वैयक्तीक अपघात विमा योजना नाशिक महानगर पालिका आस्थापना परिशिष्टावरील कायम अधिकारी/कर्मचारी यांना प्रती वार्षिक 354/- प्रमाणे राज्य शासकिय कर्मचारी समुह वैयक्तीक अपघात विमा योजना लागु करणेत आली आहे. सदर

योजने अंतर्गत एखादा कर्मचारी अपघाताने दिवंगत झाल्यास त्यांच्या वारसांना 10 लक्ष रुपये वरील विमा योजना कंपनी मार्फत आर्थिक लाभ दिला जातो. शासनाचे धर्तीवर मनपा कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकिय विमा काढण्याचे विचाराधीन आहे. तसेच प्राप्त प्रस्तावांचे विश्लेषण करुन विमा दर हप्त्यामध्ये जास्तीत जास्त विमा संरक्षण देण्याचा मानस आहे. त्या करीता कर्मचारी कल्याण निधीतुन आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

नगरसेवक स्वेंच्छा निधी व प्रभाग विकास निधी :

मागील काही वर्षांमध्ये 'नगरसेवक निधी-२%' या लेखाशिर्षाखाली खर्च झालेला नाही. तथापि यावर्षी नगरसेवक निधीतून सन्माननीय सदस्यांनी सूचविलेली कामे हाती घेणेचे नियोजन करणेत येत आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता, २% निधी राखीव ठेवणेत आलेला आहे. सन 2020-2021 करीता "नगरसेवक निधी २%" या लेखाशिर्षाखाली रु.12.00 कोटी (प्रति नगरसेवक रु.9.44 लक्ष) इतकी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यापूर्वी इतर विकास निधी या लेखाशिर्षाखाली खर्च निरंक दर्शवून,संबंधीत नियमीत लेखाशिर्षांतर्गत खर्च वर्ग करण्यात आला आहे. तथापि यावर्षी महाराष्ट्र महापालिका अधिनियम, कलम-29(अ) मधील तरतूदी विचारात घेऊन, प्रभाग विकास निधी' हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यात आले आहे. सदर लेखाशिर्षांतर्गत रु.38.10 कोटी (प्रति नगरसेवक रु.30.00 लक्ष) तरतूद करणेत आली आहे. सदर तरतुदीतून प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील रु.५.०० लक्ष मर्यादेतील अत्यावश्यक व स्थानिक स्वरुपाची कामे हाती घेणेत येतील. सदर कामांना प्रभाग समिती स्तरावर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येईल.

सन 20२०-20२1 या आर्थिक वर्षासाठी रु.2161.79 कोटी आरंभीच्या शिल्लकेसह, रु.1842.81 कोटी जमेचे व रु.2160.48 कोटी खर्चाचे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन 2020-2021 च्या मूळ अंदाजपत्रकानुसार, अखेरची शिल्लक रक्कम रु.1.31 कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे सन 2019-2020 सुधारीत व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस विनंती आहे.

नगरसेवक स्वेच्छा निधी		
सन	तरतुद	खर्च
2017-2018	7.06	0.00
2018-2019	12.76	0.41
2019-2020	12.00	6.16
2020-2021	12.00	-

प्रभाग विकास निधी		
सन	तरतुद	खर्च
2017-2018	-	-
2018-2019	-	-
2019-2020	38.10	35.57
2020-2021	38.10	-

धन्यवाद !

नाशिक
दि.20/02/२०20

18.02.2020

(राधाकृष्ण गमे)
आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक


नाशिक महानगरपालिका, नाशिक

मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

(सन १९९३-९४ ते २००५-२००६)

(रूपये कोटी)

वर्ष	मा.आयुक्त	मा.स्थायी समिती	मा.महासभा
१९९३-९४	९०.२१	९२.८०	९४.३६
१९९४-९५	१०३.४३	११२.१९	११४.३०
१९९५-९६	१२६.११	१४७.१६	१५६.०१
१९९६-९७	१६६.४५	१९७.१६	२२०.५१
१९९७-९८	२००.४९	२५७.१९	२८९.९३
१९९८-९९	३०३.७६	३६३.७६	४२३.५९
१९९९-००	२३८.३५	२७८.४२	३४३.२६
२०००-०१	२३६.६८	३१५.६३	३१०.८८
२००१-०२	३७५.७४	४३६.५८	४४४.५८
२००२-०३	३८६.५७	५६३.००	५८३.००
२००३-०४	४१०.२६	५६४.९८	५९६.९८
२००४-०५	४१७.२१	४१७.२१	४६०.२१
२००५-०६	४४७.३७	४९८.३७	६०७.९५




नाशिक महानगरपालिका, नाशिक

मा. आयुक्त, मा. स्थायी समिती व मा. महासभा यांनी संमत केलेले जमेचे अंदाज

(सन २००६-०७ ते २०२०-२१)

(रूपये कोटी)

वर्ष	मा.आयुक्त	मा.स्थायी समिती	मा.महासभा
२००६-०७	४९८.४३	५४८.४३	७२०.३९
२००७-०८	६५६.९४	७५१.९४	८७०.९४
२००८-०९	६७७.८८	८५८.८६	१०२७.८८
२००९-१०	७०७.००	८८२.५०	११०२.५०
२०१०-११	७८३.६९	९२६.९४	११८२.८६
२०११-१२	१०३०.८५	१०३०.८५	१२४४.६४
२०१२-१३	११७०.८५	१८१०.८२	२०३०.८२
२०१३-१४	१५५६.८०	२३५९.९५	२७५५.९०
२०१४-१५	१८७५.६९	२९६५.६९	३०४३.६९
२०१५-१६	१४३७.६७	१७६९.९७	२१७९.९७
२०१६-१७	१३५७.९६	१७३७.९६	१७६१.५२
२०१७-१८	१४१०.०७	१७९९.३०	२१७६.४१
२०१८-१९	१७८५.१५	१९००.१५	२०३३.४३
२०१९-२०	१८९४.५०	१९८३.५०	२३३५.८७
२०२०-२१	२१६१.७९	२३९०.३४	२९४२.१८




नाशिक महानगरपालिका, नाशिक

जमा व खर्चाचा आलेख

सन १९८२-८३ ते १९९६-१९९७

(रूपये कोटी)




वर्ष	सन ८२-८३	सन ८३-८४	सन ८४-८५	सन ८५-८६	सन ८६-८७	सन ८७-८८	सन ८८-८९	सन ८९-९०	सन ९०-९१	सन ९१-९२	सन ९२-९३	सन ९३-९४	सन ९४-९५	सन ९५-९६	सन ९६-९७
प्रारंभिक शिलकेसह एकुण जमा	११.९४	१५.८८	२२.४५	२४.३४	२६.४३	३६.१५	४६.४८	५०.८०	६६.८५	८५.६८	८९.३९	९४.३८	११०.८२	१३८.२९	१५२.४६
एकुण एकंदर खर्च	१०.२२	१२.३२	२०.१९	२२.०१	२३.०५	३०.२१	३८.०९	३९.४६	५१.८४	७०.६४	७२.९३	७३.३६	९३.७८	१२१.७९	१४८.१८

नाशिक महानगरपालिका, नाशिक

जमा व खर्चाचा आलेख

सन १९९७-९८ ते २०२०-२०२१

(रूपये कोटी)




वर्ष	सन ९७-९८	सन ९८-९९	सन ९९-००	सन ००-०१	सन ०१-०२	सन ०२-०३	सन ०३-०४	सन ०४-०५	सन ०५-०६	सन ०६-०७	सन ०७-०८	सन ०८-०९	सन ०९-१०	सन १०-११	सन ११-१२
जमा (प्रारंभिक शिलकेसह)	१८२.८७	२००.९०	२३३.५२	२८७.६७	३६९.८३	३६८.३१	३४४.४९	३४७.१३	४१२.६७	५०७.८५	५८४.६४	६०२.७२	६३८.३४	७१५.७५	८३५.९६
खर्च	१५७.३४	१९५.२४	२३०.३३	२७६.७६	३५३.६५	३५९.९७	३३५.५६	३२१.८८	३५५.९३	४५६.९९	५४१.५५	५१९.६४	५८८.१२	६६५.६६	७८८.२९

वर्ष	सन १२-१३	सन १३-१४	सन १४-१५	सन १५-१६	सन १६-१७	सन १७-१८	सन १८-१९	सन २०१९-२० मूळ अंदाज	सन २०१९-२० सुधारित अंदाज	सन २०२०-२१ मा.आयुक्तांचे अंदाज	सन २०२०-२१ मा.स्थायी समिती तरतूद	सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय अंदाज
जमा (प्रारंभिक शिलकेसह)	१००४.२०	९१४.५७	९६७.०४	११३२.८४	१२२५.५३	१४४२.०५	१६४५.९५	२३३५.८७	२०८६.३६	२१६१.७९	२३९०.३४	२९४२.१८
खर्च	९६८.५६	८५९.०५	८९७.८५	९८७.६८	१०८०.८६	११४३.९३	११६०.७४	२३३४.५९	१७६७.३८	२१६०.४८	२३८९.०३	२९४०.८७

नाशिक महानगरपालिका, नाशिक

सन २००९-१० ते २०२०-२१ महसुली खर्च

(रूपये कोटी)




वर्ष	२००९-२०१०	२०१०-२०११	२०११-२०१२	२०१२-२०१३	२०१३-२०१४	२०१४-२०१५	२०१५-२०१६	२०१६-२०१७	२०१७-२०१८	२०१८-२०१९	सन २०१९-२० मुळ अंदाज	सन २०१९-२० सुधारित अंदाज	सन २०२०-२१ मा.आयुक्तांचे अंदाज	सन २०२०-२१ मा.स्थायी समिती तरतूद	सन २०२०-२१ मुळ अंदाज
महसुली खर्च	३०३.९५	४५३.९०	४२८.२६	४९०.६२	४९६.८७	५५९.९३	५६३.८२	६३७.१८	६७१.७९	८००.५२	१०३५.७१	१०४२.८२	११५२.६४	११६२.६४	११८९.३०
प्रतिशत हिस्सा	५१.६८%	६८.१९%	५४.३३%	५०.६५%	५७.४८%	६२.३६%	५७.०९%	५८.९५%	५८.७३%	६८.९७%	४४.३६%	५९.००%	५३.३५%	४८.६७%	४०.४४%

नाशिक महानगरपालिका, नाशिक

भांडवली खर्च

(सन २००९-१० ते २०२०-२१)

(रूपये कोटी)




वर्ष	२००९-२०१०	२०१०-२०११	२०११-२०१२	२०१२-२०१३	२०१३-२०१४	२०१४-२०१५	२०१५-२०१६	२०१६-२०१७	२०१७-२०१८	२०१८-२०१९	सन २०१९-२० मुळ अंदाज	सन २०१९-२० सुधारित अंदाज	सन २०२०-२१ मा.आयुक्तांचे अंदाज	सन २०२०-२१ मा.स्थायी समिती तरतूद	सन २०२०-२१ मुळ अंदाज
भांडवली खर्च	२६६.६३	१९४.३०	३१८.७४	४०७.५७	३१६.२४	३०१.४५	३८४.९६	३९८.५७	४३०.८४	३१८.५९	१२४२.८९	६४०.१७	९०५.७१	११२४.२६	१६४९.४३
प्रतिशत हिस्सा	४५.३४%	२९.१९%	४०.४३%	४२.०८%	३६.८१%	३३.५७%	३८.९८%	३६.८८%	३७.६६%	२७.४५%	५३.२४%	३६.२२%	४१.९२%	४७.०६%	५६.०९%

नाशिक महानगरपालिका, नाशिक

भांडवली खर्चाचा अंदाज

(सन २०२०-२१)

		(रु. कोटी)	प्रतिशत
१	बांधकाम/विद्युत/उद्यान/ इतर भांडवली कामे	७७९.५९	४७.२६%
२	नगर नियोजन	३१३.५०	१९.००%
३	शासन योजना-मनपा हिस्सा	७३.५१	४.४६%
४	राखीव बाबी	१४१.१६	८.५६%
५	नगरसेवक स्वेच्छा निधी/ प्रभाग विकास निधी	१०७.२५	६.५०%
६	"क" भांडवली खर्च (पाणी पुरवठा/मलनि:सारण/ जलनि:सारण)	२३४.३१	१४.२१%
७	"प" भांडवली खर्च	०.११	०.०१%
	एकूण भांडवली खर्च	१६४९.४३	१००.००%




नाशिक महानगरपालिका, नाशिक

जमेचे अंदाज

सन २०२०-२१

		(रु. कोटी)	प्रतिशत
१	वस्तू व सेवा कर (GST) /स्थानिक संस्था कर/जकात	१०८१.८२	३६.७७%
२	मालमत्ता कर (घरपट्टी)	१४८.८६	५.०६%
३	नगर नियोजन	२८४.८६	९.६८%
४	पाणी पट्टी	६५.२०	२.२२%
५	मिळकत, नगर नियोजन फी, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक इ.	५११.०३	१७.३७%
६	रोड डॅमेज चार्ज, ड्रेनेज/पाणी कनेक्शन फी इ.	२३.००	०.७८%
७	अनुदाने	१६.१०	०.५५%
८	परिवहन सेवा उत्पन्न	१०.००	०.३४%
९	संकिर्ण	३०.६७	१.०४%
१०	अग्रीम/इतर उचल रक्कमा	१५१.६६	५.१५%
११	कर्ज	३००.००	१०.२०%
१२	सुरवातीची शिल्लक	३१८.९८	१०.८४%
	एकूण	२९४२.१८	१००.००%




नाशिक महानगरपालिका, नाशिक

खर्चाचे अंदाज

सन २०२०-२१

		(रु. कोटी)	प्रतिशत
१	सार्वजनिक बांधकाम	७०२.०८	२३.८८%
२	सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी	२५४.५२	८.६५%
३	नगर नियोजन	३८९.५०	१३.२४%
४	समाजकल्याण	१९१.३२	६.५१%
५	शिक्षण	१०८.३७	३.६८%
६	घनकचरा व्यवस्थापन	१०८.३०	३.६८%
७	सार्वजनिक आरोग्य	७१.३७	२.४३%
८	सार्वजनिक वाहतूक व नियोजन	८२.३०	२.८०%
९	विद्युत व यांत्रिकी	७२.४८	२.४६%
१०	मालमत्ता कर/स्थानिक संस्था कर	३१.११	१.०६%
११	उद्यान	२४.२३	०.८२%
१२	अन्य विभाग	७०.२१	२.३९%
१३	नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग विकास निधी	१०७.२५	३.६५%
१४	आस्थापना/कार्यालयीन खर्च	६७०.४४	२२.८०%
१५	संकीर्ण	५७.३९	१.९५%
	एकूण	२९४०.८७	१००.००%



महसुली व भांडवली जमा

गोषवारा

नाशिक महानगरपालिका, नाशिक
सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक
महसुली व भांडवली जमा गोषवारा

(रुपये लक्ष)

अ.नं.	लेखाशिर्ष	प्राधिकृत अधिकारी	संगणक कोड नंबर	ERP Budget Code	सन 2016-17 प्रत्यक्ष	सन 2017-18 प्रत्यक्ष	सन 2018-19 प्रत्यक्ष	सन 2019-20 अर्थसंकल्पीय अंदाज	सन 2019-20 मा. आयुक्तांचे सुधारित अंदाज	सन 2020-21 मा. आयुक्तांचे अंदाज	सन 2020-21 मा. स्थायी समिती तरतूद	सन 2020-21 मा. महासभा अर्थसंकल्पीय अंदाज
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)
	जमा बाजु गोषवारा											
	प्रारंभिक शिल्लक				**14515.64**	**14467.20**	**29812.08**	**22792.43**	**48520.62**	**31898.09**	**31898.09**	**31898.09**
	'अ' अंदाजपत्रक महसुली जमा											
I)	महानगरपालिका दर व कर				82458.28	99398.46	105689.79	119319.10	112212.50	120822.50	120822.50	120822.50
II)	विशेष अधिनियमान्वये वसुली				3.71	1.08	0.00	0.50	0.50	0.50	0.50	0.50
III)	मनपा उपयोगीता सेवा व कर आकारणी व्यतिरीक्त शक्तीपासुन मिळणारा महसुल				4122.50	14154.84	6830.27	66915.61	24882.00	31947.50	39802.50	76074.71
IV)	अनुदाने / अंशदाने				360.79	340.69	704.95	635.00	555.50	597.50	597.50	609.50
V)	संकिर्ण				8098.15	2952.26	7060.06	2425.00	2988.00	3087.50	3087.50	3087.50
	एकूण 'अ' अंदाजपत्रक महसुली जमा				**95043.43**	**116847.34**	**120285.07**	**189295.21**	**140638.51**	**156455.50**	**164310.50**	**200594.71**
	एकूण 'क' अंदाजपत्रक महसुली जमा				3807.92	5579.01	6310.92	10031.00	7537.50	9180.50	9180.50	9180.50
	एकूण 'प' अंदाजपत्रक महसुली जमा				142.24	154.29	166.97	177.50	172.00	177.50	177.50	177.50
	एकूण 'अ' + 'क' + 'प' महसुली जमा				**98993.59**	**122580.63**	**126762.96**	**199503.71**	**148348.01**	**165813.50**	**173668.50**	**209952.71**

नाशिक महानगरपालिका, नाशिक
सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक
महसुली व भांडवली जमा गोषवारा

(रुपये लक्ष)

अ.नं.	लेखाशिर्ष	प्राधिकृत अधिकारी	संगणक कोड नंबर	ERP Budget Code	सन 2016-17 प्रत्यक्ष	सन 2017-18 प्रत्यक्ष	सन 2018-19 प्रत्यक्ष	सन 2019-20 अर्थसंकल्पीय अंदाज	सन 2019-20 मा. आयुक्तांचे सुधारित अंदाज	सन 2020-21 मा. आयुक्तांचे अंदाज	सन 2020-21 मा. स्थायी समिती तरतूद	सन 2020-21 मा. महासभा अर्थसंकल्पीय अंदाज
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)
	भांडवली जमा											
	'अ' अंदाजपत्रक भांडवली जमा				425.00	125.00	431.76	1000.50	1000.50	1000.50	16000.50	34900.50
	'क' अंदाजपत्रक भांडवली जमा				1919.76	361.28	3298.53	2300.00	1675.00	2300.00	2300.00	2300.00
	'प' अंदाजपत्रक भांडवली जमा				0.00	0.00	0.00	0.50	0.50	0.50	0.50	0.50
	एकूण 'अ' + 'क' + 'प' भांडवली जमा				**2344.76**	**486.28**	**3730.29**	**3301.00**	**2676.00**	**3301.00**	**18301.00**	**37201.00**
VI)	**अग्रीम जमा**				**6699.25**	**6671.31**	**4289.39**	**7990.00**	**9091.00**	**15166.00**	**15166.00**	**15166.00**
	एकूण एकंदर जमा				**108037.60**	**129738.22**	**134782.63**	**210794.71**	**160115.01**	**184280.50**	**207135.50**	**262319.71**
	प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा				**122553.25**	**144205.42**	**164594.71**	**233587.14**	**208635.62**	**216178.59**	**239033.59**	**294217.80**

महसुली व भांडवली खर्च

गोषवारा

नाशिक महानगरपालिका, नाशिक
सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रक
महसुली व भांडवली खर्च गोषवारा

(रुपये लक्ष)

अ.नं.	लेखाशिर्ष	प्राधिकृत अधिकारी	संगणक कोड नंबर	ERP Budget Code	सन 2016-17 प्रत्यक्ष	सन 2017-18 प्रत्यक्ष	सन 2018-19 प्रत्यक्ष	सन 2019-20 अर्थसंकल्पीय अंदाज	सन 2019-20 मा. आयुक्तांचे सुधारित अंदाज	सन 2020-21 मा. आयुक्तांचे अंदाज	सन 2020-21 मा. स्थायी समिती तरतूद	सन 2020-21 मा. महासभा अर्थसंकल्पीय अंदाज
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)
	<u>खर्च बाजु गोषवारा</u>											
	'अ' अंदाजपत्रक महसुली खर्च											
